उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाणा
एवरेस्ट मुरमाडूर साबुदाणा
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. ११.०७.२०२४ | अंक नं. ११२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, वाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमूर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775069505

स्पर्टीवेट आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30% 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

नगरमधील एकाच इमारतीतील ६ फ्लॅटमधून भरदिवसा चोरी; लाखोंचा ऐवज लंपास मात्र फिर्याद घेण्यास पोलिसांची टाळाटाळ

नगर – नगर शहरात जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ एका इमारतीतील ६ फ्लॅट चोरट्यांनी बुधवारी (दि.१०) दुपारी फोडून रोख रक्कम व दागिने असा लाखोंचा ऐवज चोरून नेला आहे. मात्र या भरदिवसा झालेल्या घरफोड्यांची फिर्याद घेण्यास कोतवाली पोलिसांनी टाळाटाळ केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. पोलिसांनी आपली फिर्याद नोंदवून घ्यावी म्हणून चोरी झालेले नागरिक बुधवारी सायंकाळपासून पोलिस ठाण्यात चकरा मारत आहेत.

जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ चांदणी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पूजा कॉम्प्लेक्स ही इमारत आहे. या इमारतीत असलेले ६ फ्लॅट चोरट्यांनी बुधवारी (दि.१०) दुपारी ३.१५ ते ३.३० च्या सुमारास फोडले आहेत. यामध्ये माधुरी शिंदे यांच्या फ्लॅटमधून चोरट्यांनी १० हजारांची रोकड आणि ७ लाखांचे सोन्याचे विविध प्रकारचे दागिने चोरून नेले आहेत. या दागिन्यांसोबत त्यांचे बॉक्स आणि पावत्याही चोरट्यांनी चोरून नेल्या. रिजवान तांबोळी यांच्या फ्लॅटमधून १७ हजारांची रोकड चोरीला गेली आहे. या शिवाय डॉ. फ्रान्सिस, खान, प्रा. कोहली यांचेही फ्लॅट चोरट्यांनी फोडले आहेत. या सर्व फ्लॅटमध्ये चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर उचकापाचक करत फ्लॅटमधील सर्व साहित्य अस्ताव्यस्त केलेले आहे.



जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील पूजा कॉम्प्लेक्समध्ये चोरट्यांनी भरदिवसा ६ फ्लॅट फोडून केलेली उचकापाचक छायाचित्रात दिसत आहे. (छाया – बबलू शेख)

पोलिस म्हणतात एवढे दागिने तुमच्याकडे होते का?

या घरफोड्या झाल्याचे लक्षात आल्यावर ज्यांचे फ्लॅट चोरट्यांनी फोडले आहेत ते नागरिक बुधवारी सायंकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गेले असता त्यांना आमच्याकडे माळीवाडा येथील गोळीबारीची केस असून त्याचा तपास सुरु आहे. तुम्ही उद्या सकाळी या असे सांगण्यात आले. त्यानंतर नागरिक गुरुवारी (दि.११) सकाळी फिर्याद देण्यासाठी गेले असता त्यांच्यावरच पोलिसांनी प्रश्नांची सरबत्ती केली. ७ लाखांचे सोने चोरीला गेलेल्या माधुरी शिंदे यांना (पुढील मजकूर पान २ वर)

यशस्वी भव
सी.ए.परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल आमचे भाचे श्री.प्रविण तनपुरे यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन! तसेच पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!
: शुभेच्छुक :
सचिन बेरड
सचिन एन्टरप्रायजेस्
चितळेरोड, अ.नगर

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टंट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर.
(0241) 2343896/2341196

Career Kaa Sarvaat DISHA ke saath
2 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी अनुभवलेला कोर्स
DCGA
Diploma Course in Graphics & Office Automation
JUST IN 8900/-
GET READY FOR YOUR JOB
JOIN TODAY
MS-OFFICE | TALLY PRIME | GST
CORELDRAW | ILLUSTRATOR | PHOTOSHOP
WEB PAGE DESIGNING | BASIC HARDWARE
Duration : 6 Months
Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 — 9371051769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Malwada Stand, Station Road, A.nagar — 9371151769
Pipeline Branch — Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 — 7447761769

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातून
दरपत्रक
■ नगर येथून स. ६,८,९ व दुपारी २.००
■ पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
मिळण्याचा पॉईंट - निलायम पॉल, प्रोव्ही सेन्टील, सावरकर पुतळा, एम.एस.ई.बी. ऑफीस रोड, कोपरगाव
पुणे ट्रॉव्ह- यशोदी, खराडी बायपास, वेगळा, नवीन विद्यानिकेतन बालवाडीच्या मुलीकरिता आरक्षण
अमर-प्रेम हॉलिडेज
ऑफिस- पिपलाईन,अ.नगर
9657746555/ 9226399555

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
किडनी विकार व बालरोग मोफत तपासणी शिबीर
किडनी विकार तपासणी शिबीर
शुक्रवार - दि. १२-०७-२०२४
* वेळ : सकाळी १० ते २
किडनीचे आजार –
* अंगावर सुज येणे, लघवी कमी/ लाल होणे, किडनी जंतु संसर्ग, डायलेसिस इ. उपचार व निदान
* महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत 'डायलेसिस' मोफत केले जातील.
तज्ञ डॉक्टर
डॉ. गोविंद कासट
Nephrologist
बालरोग तपासणी शिबीर
शुक्रवार - दि. १९-०७-२०२४
* वेळ : सकाळी ११ ते २
• २६ बेडचे एन.आय.सी.यू. अद्ययावत रुग्णालय..
• नवजात बाळाच्या श्वासोच्छ्वासाच्या होणाऱ्या त्रासावर उपचार
• बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात कावीळसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा.
• अनुवंशिक आजार व जन्मजात आजारावर निदान.
• बालदमा तसेच लहान मुलांचे टु-डी इको, एक्स-रे, पॅथोलॉजी लॅब २४ तास उपलब्ध.
• आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीचे मशिन्स् उपलब्ध..
• २४ तास तज्ञ डॉक्टर्स उपलब्ध.
• महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया केले जातील.
दर शनिवारी मोफत ओपीडी
सोमवार ते शुक्रवार (बालरोग तज्ञांची) ओपीडी रु. 50/-
तज्ञ डॉक्टर
डॉ. श्रेयस सुरपुरे — Consultant Pediatrician and Neonatologist
डॉ. रुपेश सिकची — Pediatric Surgeon
डॉ. सोनाली कणसे — Neonatologist & Pediatrician
डॉ. वैभवी वंजारे — Neonatologist & Pediatrician
महावीर भवन
रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध.
भोजन रु. 35/- मात्र
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
डिजिटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी रू. 750/- | सिटीस्कॅन रू. 1250/- | एम.आर.आय. रू. 2500/-
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहमदनगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/ ७४/ ७५/ ७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

आकर्षक टॉईजवर
२५% सूट
आर.एन.आर्ट अॅण्ड क्राफ्ट
गिफ्ट अॅण्ड स्कूल स्टेशनरी । होलसेल अॅण्ड रिटेलर
एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझ्ड गिफ्ट अॅण्ड टॉईज
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर-४१४००१
मो : 9325329061/ 9373417113

दिप : सुट्टी-रो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 12 ते 19 जुलै 2024
कल्की (2D) 9.00 AM, 3.30 PM, 10.15 PM
(3D) 12.00 PM, 7.15 PM
सरफिरा 7.30 AM, 10.30 AM, 4.15 PM, 7.15 PM, 10.45 PM
हिन्दुस्तानी २ 9.00 AM, 3.30 PM, 9.45 PM
रांगडा (मराठी) 12.30 PM
बाई गं (मराठी) 1.30 PM, 7.00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher"
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

VAISHNAVI TILES
& TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262151515
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य नुंद्येवा
email - navamaratha@gmail.com

समर्पित भावबंधाच्या वारकरी महिला

राज्यभरातून चाललेल्या दिंड्या पंढरपुरी मार्गस्थ होत आहेत. लाखो वारकऱ्यांच्या या सरितेत महिलांचीही मोठी संख्या आहे. त्यांच्या कुटुंबासह भक्तीत समर्पित भावबंधास नमन.

शेतीचा शोध लावणाऱ्या बाईच्या जातीला मातीमध्ये, नात्यांमध्ये खोलवर रुजण्याची अपार शक्ती जन्मजात माहीत असते. रुजण्याच्या मातीसह नात्यांच्या रुजवातीचीही तिला सखोल जाणीव असते. त्यामुळेच ती शेती, नाती, घरघर, मापसांचं एक नवं विश्व निर्माण करू शकते.

तरीही आज संतपरंपरेत महिलांची संख्या नगण्यच आहे. आपल्या सामाजिक जीवनात, अध्यात्म व किर्तन देण्यात 'तिची' संख्या वाढत असली तरी सर्वदूर तिचा सहभाग वाढणं आवश्यक आहे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१

आजही स्त्रीचं समाजात दुय्यम स्थानावर राहावं लागतंय. तिला मोकळा बास घेण्यासाठी आश्वस्त जागा कुटुंबात, संसारात, समाजात अजूनही सापडलेलीच नाही.

मुकाई, जनाई, कान्होपात्रा यांची परंपरा समृद्ध होईन स्त्री भक्त, संत, वारकरी वाढत गेल्यास समाजालाही फायदा होईल. डोईवर तुळशी, खेडयात परसातलं तुळशी वृंदावन आणि शहरातील छोट्याशा फ्लॅट, घरात तुळस खुलवणारी स्त्री जागोजागी दिसणं, तिचा सन्मान होणं याने विठुरायाही प्रसन्न होईल. तिचं सन्मानपूर्वक अस्तित्व हेच विठ्ठलाचे दर्शन!

महापालिकेतील समावेशानंतर भिंगाऱ्याच्या नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवाव्यात

वसंत राठोड यांची केंद्र सरकारकडे मागणी

नगर – अहमदनगर कॅन्टोन्मेंट बोर्ड महापालिकेमध्ये वर्ग होत आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर भिंगारमधील सदरबाजार येथील नागरिकांना मालमत्तेबाबत भविष्यात अडचणी येऊ नयेत, यासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे बोर्डचे मानद सदस्य वसंत राठोड यांनी पाठपुरावा सुरु केला आहे.

कॅन्टोन्मेंट बोर्ड क्षेत्राचे महापालिकेत विलीनीकरण करण्याची प्रक्रिया प्रशासनस्तरावर जोरात सुरु झाली आहे. २५ जून २०२४ रोजी दिल्लीमध्ये संरक्षण सचिवांच्या झालेल्या बैठकांमध्ये संपूर्ण कॅन्टोन्मेंट बोर्डची नागरी वसाहत महापालिकाकडे देण्याचे ठरले. परंतु अहमदनगर भिंगार कॅन्टोमेंट बोर्ड येथील सदरबाजार भागातील मालमत्तेवरील मालकी हक्क केंद्र सरकारकडे राहणार आहेत. यामुळे सदरबाजार भागात राहणाऱ्या नागरिकांना त्रास वाढणार आहे. जागेवर मालकी हक्क नसल्याने जागा विकणे, खरेदी करणे किंवा सातबारा उतारा काढणे, जागेवर कर्ज घेणे अशा प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना सदन कमांड पुणे या ठिकाणी संपर्क करावा लागेल. जो अत्यंत त्रासदायक आहे. अशा प्रकारे सदरबाजार भागात राहणाऱ्या नागरिकांना राज्य व केंद्र अशा दोन प्रशासनाला तोंड द्यावे लागेल. याचे उदाहरण म्हणजे रामवाडी, कोठला बस्स्थानक, तारकपूर भागातील नागरिक दुहेरी त्रास सहन करीत कसरत करीत आहेत. १९५६ सालामध्ये सर्व भाग वेगळा केला असला तरी, आजही तेथील रहिवाशांना सातबारा उतऱ्यासाठी पुणे येथेच चकरा माराव्या लागतात. त्या मोकळ्या जागा महापालिकेकडे वर्ग होणार आहेत. त्या जागांवर केंद्र सरकारची मालकी असल्यामुळे त्यांना विकसित करण्यासाठी प्रत्येकवेळी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागेल.

या सर्व समस्या लक्षात घेता, सदरबाजार भागातील सर्व मालमत्तांचे मालकी हक्क हे राज्य सरकारकडे द्यावेत. म्हणजेच या सर्व मालमत्ता संबंधित घर मालकास मालकी हक्क देण्यात यावा, अशी मागणी श्री. राठोड यांनी सुजय विखेंच्या माध्यमातून केंद्राकडे केली आहे.



भिंगारकडे जाणारा रस्ता बनलाय मृत्यूचा सापळा, विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात

नगर शहरापासून भिंगारकडे जाणारा रस्ता अतिशय खराब झाला असून या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून पावसाळ्यात त्यात साचलेल्या पाण्यामुळे रस्त्यावरून ये जा करणाऱ्या नागरिकांसह शाळेतील विद्यार्थ्यांचेही जीव धोक्यात आले आहेत. या रस्त्यावर दोन मोठ्या शाळा आणि अनेक कार्यालय असल्यामुळे या रस्त्यावर भिंगारकरांसह नागरिकांची मोठी वर्दळ असते मात्र खराब रस्त्याकडे प्रशासन लक्ष देत नाही. प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. (छाया- पनेश कटारिया)

भिंगार शहरातील एका शाळेच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून रस्त्यावर खड्डे पडून पावसामुळे रस्त्यावर पाण्याचे डबके तयार झाले आहे. या चिखलातून शाळेत जाताना विद्यार्थ्यांना मात्र कसरत करावी लागत आहे.

ड्रेनेजचे उघडे झाकण लहान मुलांसाठी धोकादायक

एल.आय.सी ऑफिस समोरील ड्रेनजचे उघडे झाकण धोकादायक बनले आहे. एका नामांकित शाळेसमोरील हे उघडे झाकण लहान मुलांसाठी धोकादायक ठरू शकते यासाठी प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी शाळेतील पालकांकडून होत आहे.

आम्ही शाळेत कसं जायचं? विद्यार्थ्यांसह पालकांचा सवाल

नगर – भिंगार शहरातील एका शाळेच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झालेली दिसून येत आहे. रस्त्यावर खड्डे पडले आहे. सध्याच्या पावसामुळे रस्त्यावर पाण्याचे डबके तयार झाले असून त्या पाण्यावर डासांचा वावर होत आहे. सर्वत्र चिखलमय रस्ता निर्माण झाला आहे. सर्वत्र शाळेची घंटा वाजली आणि सर्व शाळा, विद्यालये सुरु झाली. शैक्षणिक धडे शिक्ष्यासाठी विद्यार्थी आतुर आहेत पण चिखलाचा रस्ता येतोय आडवा!

रस्त्यावरून पावसाळ्यात शाळेला जाताना मोठी कसरत करावी लागते. दरवर्षी याच रस्त्याने शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना चिखल तुडवीत जावे लागते. अनेक विद्यार्थी तसेच नागरिक चिखलात घसरून पडतात. हा रस्ता वर्दळीचा असून, दुचाकी देखील शाळेच्या दिशेने मार्गक्रमण करू शकत नाही कारण विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी पुरेसा रस्ता नाही. वाहनधारकांना तसेच पायी चालणाऱ्या विद्यार्थ्यांना पालकांना खुप कसरत करत शाळेच्या दिशेने मार्गक्रमण करावे लागत आहे.पावसाच्या पाण्यामुळे झालेल्या चिखलमय रस्त्यावरून चालताना चिमुकल्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.आम्ही शाळेत कसं जायचं? आम्हाला शाळेत जाण्यासाठी चांगला रस्ता द्या, अशी मागणी विद्यार्थ्यांसह पालकवर्ग करत आहे. या खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांना मानसिक व शारीरिक त्रास होताना दिसून येत असून त्यामुळे संतप्त व्यक्त होत आहे.

पाळीव कुत्रा चावल्याने मालकावर गुन्हा दाखल

नगर – वृध्द व्यक्तीला कुत्रा चावल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कुत्र्याच्या मालकाविरुध्द कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २९१ (प्राण्याबाबतची हयगयीचे वर्तन) सह बीपी ॲक्ट १०६, १७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजु चव्हाण (पूर्ण नाव नाही, रा. बंगाल चौकी, मार्केटयार्ड रस्ता, नगर) असे गुन्हा दाखल झालेल्या कुत्र्याच्या मालकाचे नाव आहे.

मुकेश दाडुलाल मुथियान (वय ६२, रा. चर्च रस्ता, खिस्त गल्ली, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांना कुत्रा चावल्याची घटना मंगळवारी (दि.९) सकाळी साडेअकराच्या सुमारास बंगाल चौकी, मार्केटयार्ड रस्ता येथे घडली. मुकेश मुथियान हे मंगळवारी सकाळी त्यांच्या राहत्या घरातून निघाले व माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिरात दर्शन घेण्यासाठी गेले. दर्शन घेऊन परत घरी जात असताना साडेअकराच्या सुमारास बंगाल चौकी, मार्केटयार्ड रस्ता येथे त्यांना डाव्या पायाच्या गुडघ्यावर कुत्र्याने चावा घेतला. त्यात ते जखमी झाले. सदरचा कुत्रा राजु चव्हाण यांनी पाळलेला असल्याचे समोर आले. मुथियान यांनी जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार घेतल्यानंतर कोतवाली पोलीस ठाणे गाठून कुत्र्याच्या मालकाविरूध्द फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार ओटी करत आहेत.

सौ. सरस्वतीबाई बोरुडे यांचे निधन

नगर – बोल्हेगावच्या गांधीनगरमधील रहिवासी सौ. सरस्वतीबाई मच्छिंद्र बोरुडे (वय ८०) यांचे १० जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पती, चार मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक बोरुडे यांच्या त्या मातोश्री होत.

व्यावसायिक विठ्ठल कुटे यांचे निधन

नगर – येथील विठ्ठल नवनाथ कुटे (वय ४२) यांचे ६ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, आई, वडील, भाऊ २ बहिणी, पुतण्या असा परिवार आहे.

त्यांचा सेल्फ एम्प्लॉय हा व्यवसाय होता. नवनाथ हरिभाऊ कुटे यांचा मुलगा होत.

कामत शिंगवे येथील प्रगतशिल शेतकरी शिवाजी कराळे यांचे १०२ व्या वर्षी निधन

नगर – कामत शिंगवे, जवखेडे (ता.पाथर्डी) येथील प्रगतशिल शेतकरी शिवाजी पाटीलबा कराळे (वय १०२) यांचे ९ जुलै रोजी रात्री ८ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. १० जुलै रोजी सकाळी गावच्या अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ५ मुली, जावई, नातवंडे, रेवजी कराळे हे बंधू, गोरक्षनाथ कराळे हा पुतण्या, श्रीमती सुवर्णा संभाजी कराळे-मांगे ही सुन असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल नुंद्येवा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य नुंद्येवा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

नगरमध्ये १६ जुलै रोजी 'महा रक्तदान' शिबीर

अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे आयोजन

नगर – माणुसकीचे नाते जोडणारे रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे असे म्हणतात. अत्यवस्थ रूग्ण, थॅलेसेमियाग्रस्त रूग्णांना एखाद्याने केलेले रक्तदानच जीवदान देणारे ठरते. रक्तदानाची ही चळवळ समाजात खोलवर रूजण्यासाठी अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने जिल्हास्तरीय महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यात नगर जिल्ह्याच्या इतिहासातील विक्रमी रक्त पिशव्या संकलन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. १६ जुलै रोजी सकाळी ७ ते रात्री ८ यावेळेत न्यू टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स येथे सदर शिबीर होणार आहे, अशी माहिती ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष अजित जगताप व अहमदनगर जिल्हाध्यक्ष अजित पवार यांनी दिली.

या शिबीरासाठी संग्रामभैय्या जगताप सोशल फाऊंडेशन, आय लव्ह नगर, ऑल इंडिया मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे सहकार्य लाभले आहे. नगरमधील दहा रक्तपेढींची टिम शिबिरात रक्त संकलनाचे काम पाहणार आहे.

या उपक्रमाचे स्वागत करताना आ.संग्राम जगताप म्हणाले, अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनने सामाजिक बांधिलकी जपत २०२२ मध्ये महा रक्तदान शिबिर घेवून विक्रमी रक्त संकलन केले होते. यावर्षी देखील असाच विक्रमी रक्तदानाचा संकल्प करण्यात आला आहे. रक्तदान चळवळ ही काळाची गरज आहे. एखाद्याने स्वेच्छेने केलेले रक्तदान गरजू रूग्णांसाठी वरदान ठरते. अनेक आजारात रक्त घटकांचीही आवश्यकता असते. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी कृत्रिम रक्त निर्मिती शक्य झालेली नाही. अशावेळी माणसाने माणसासाठी केलेले रक्तदानच महत्वाचे असते. रक्तदानामुळे रक्तदाताचे आरोग्यही चांगले राहते हे संशोधनातून पुढे आले आहे. त्यामुळे नगरचे हे महा रक्तदान शिबीर महाराष्ट्राच्या नकाशावर येईल यासाठी जास्तीत जास्त नगरकरांनी रक्तदानासाठी पुढे यावे, असे आवाहन आ. जगताप यांनी केले आहे.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, रक्तदान हा अतिशय महत्वाचा विषय आहे. जसे आपण म्हणतो अन्नदान हे श्रेष्ठ दान तसेच रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. नगरकर सामाजिक उपक्रमात नेहमीच अग्रेसर असतात. रक्तदान चळवळ नगरकरांनी पुढे नेलेली आहे. त्यामुळे आताच्या महा रक्तदान शिबीरातही नगरकरांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून रक्तदानाचे पवित्र कार्य करावे, असे आवाहन फिरोदिया यांनी केले आहे.

नगरकरांनी प्रतिसाद द्यावा व सहभाग नोंदवावा असे आवाहन असोसिएशनच्या वतीने कोअर कमिटी सदस्य अमित बुरा, रितेश सोनीमंडलेचा, साजीद खान, प्रितम तोडकर, राकेश सोनीमंडलेचा, हिरा खुबचंदानी, मनोज बरलोटा, संतोष बलदोटा, गोरख पठोळे, मनिष चोपडा, अतुल रथा आदींनी केले आहे.

नगरमधील एकाच इमारतीतील ६ फ्लॅटमधून भरदिवसा चोरी

(पान १ वरून)

तुम्ह्याकडे खरेच एवढे दागिने होते का? त्या दागिन्यांच्या पावत्या घेवून या असे सांगितले. शिंदे यांनी दागिन्यांच्या पावत्या बॉक्समध्येच होत्या. चोरटे बॉक्ससह दागिने घेवून गेले आहेत असे सांगत होत्या, परंतु त्यांचे म्हणणे पोलिसांनी ऐकून घेतले नाही. इतरांच्या बाबतीतही असाच प्रकार घडला.

चेन स्नॅचिंगचा गुन्हाही नोंदवला नाही

याच इमारतीत राहणाऱ्या सरोज अरविंद हिवाळे या बुधवारी (दि.१०) सकाळी ६.१५ च्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी गेल्या होत्या. सैनिक लॉन्स्या गेट समोरून त्या जात असताना त्यांच्या पाठीमागून एका मोटारसायकलवर दोघे जण आले. त्यांनी हिवाळे यांच्या गळ्यातील सोन्याची दीड तोळा वजनाची सोन्याची चेन हिसका मारून तोडली व त्यांना ढकलून देत भरधाव वेगात तेथून पसार झाले. हिवाळे या रस्त्यावर पडल्या. त्यांना उठेपर्यंत ते दोघे चोरटे तेथून पसार झाले होते. त्यामुळे हिवाळे यांना त्यांच्या मोटारसायकलचा नंबरही पाहता आला नाही. याबाबत फिर्याद देण्यासाठी हिवाळे या कोतवाली पोलिस ठाण्यात गेल्या असता त्यांना आता साहेब नाहीत तुम्ही दुपारी १.३० वाजता या असे तीथील ठाणे अंमलदाराने सांगितले. त्यानंतर त्या दुपारी गेल्या असता त्यांची हकीकत लिहून घेतली. मात्र गुन्हा गुरुवारी (दि.११) दुपारी उशिरापर्यंत दाखल केला नव्हता. ही सर्व कैफियत ज्यांची चोरी झाली त्या महिलांनी व नागरिकांनी दैनिक नवा मराठाच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितली. तसेच पोलिस आमचे ऐकून घेत नाहीत मग आम्ही न्याय कोणाकडे मागायचा असा उद्विग्न सवाल केला.

जमीन महसूल अधिनियमानुसार कार्यवाही झालेली नसल्याने 'त्या' नियमबाह्य रिव्हीजन नोटीसा रद्द करा

सारसनगरमधील मालमत्ताधारकांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

नगर – सारसनगर लेआऊटस्मधील सर्व्हे नं. १४९ संदर्भात अनियमितता आणि शासकीय अधिकाराचा गैरवापर संदर्भात तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीवर लोकायुक्त यांनी महाराष्ट्र लोकायुक्त आणि उपलोकायुक्त अधिनियम १९७१ च्या कलम २ के नुसार सुनावणी घेऊन जिल्हाधिकारी यांना चौकशी करण्याचे व आदेश असल्यास गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले होते. परंतु सदर कायद्यानुसार फक्त शासकीय कर्मचाऱ्यांसंदर्भात कार्यवाही करता येते. सामान्य मालमत्ताधारक किंवा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार नाही असे असताना जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधितांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २५८ नुसार नोटीसा काढुन मह./ कार्या /जमीन १-अ /तक्रार अर्ज क्र. ०१ /२०१६ दिनांक २१ /०५/२०१८ नुसार अज्ञात व्यक्ती विरुध्द एफआयआर दाखल करून पोलीस चौकशी करण्यास सांगितले.

सदर पोलीस चौकशी सुरू होती परंतु अचानक तक्तालिन जिल्हाधिकारी यांनी सर्व प्रशासकीय अधिकारी यांची बैठक घेऊन इतिवृत्त क्र/मह /जमीन १-अ /१२२४ /२०१९ नुसार विविध कार्यवाहीचे आदेश दिले. यात प्रामुख्याने संपूर्ण सर्व्हेच्या सर्व मालमत्ता खरेदी, विक्री, गहाण बंदी, फेरफार नोंदी व रेखांकन रिव्हीजनमध्ये घेणे, सर्व मालमत्ता अतिक्रमण घोषित करून कार्यवाही करणे व इतर सर्व निर्देश प्रत्यक्ष मालमत्ताधारकांसंदर्भात असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार सर्व संबंधितांना नोटीसा देऊन आपल्या हरकती व सूचना देण्यासाठी संधी देणे आवश्यक होते. परंतु पुढे अपील करण्यासाठी हे निर्देश कोणत्या नियमांअंतर्गत आहे. यासाठी जिल्हाधिकारी तसेच आरडीसी यांच्याकडे वारंवार विचारणा करुनही कोणतीही माहिती दिली जात नव्हती. माहीती अधिकारात लेखी तक्रार केली तेव्हा महसुल तहसीलदार यांनी सदर कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार असुन सदर इतिवृत्त निर्देशच आदेश समजण्यात यावे व तुम्हास ते मान्य नसेल तर आयुक्त नाशिक विभाग यांच्याकडे दाद मागावी असे पत्र दिले. त्यानुसार आयुक्त यांच्याकडे त्या निर्देशाविरूध्द अपिल दाखल केले. परंतु त्यावर आयुक्त यांनी सदर इतिवृत्त निर्देश हे प्रशासकीय काम आहे आणि हे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार नाही. त्यामुळे सदर अपिल सुनावणीत घेता येत नाही आणि सदर इतिवृत्त निर्देशाला आदेश समजावे असे पत्र देणे बेजबाबदारपणाचे असल्याचे ताशेरे ओढले. हे इतिवृत्त आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार नाही हे स्पष्ट झाले आहे. तरी गेल्या पाच वर्षापासून खरेदी विक्री गहाण बंदी का करण्यात आली आहे? फेरफार नोंदी आणि रेखांकन रिव्हीजनमध्ये घेण्याच्या नोटीसा कोणत्या नियमांअंतर्गत आहे हे माहीती होणे महत्वाचे आहे. मुळात जर तक्रार महाराष्ट्र लोकायुक्त आणि उपलोकायुक्त अधिनियम १९७१ नुसार आहे तर ती फक्त कायद्याने शासकीय कर्मचारी संदर्भातच आहे. मग सामान्य मालमत्ताधारकांवर कार्यवाही कोणत्या नियमांअंतर्गत आहे आणि ती जर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार आहे तर त्यासाठी संबंधित तक्रारदार कोण आहे? जोपर्यंत त्या मालमत्ता संबंधित व्यक्ती तक्रार करत नाही तोपर्यंत ती कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार करता येत नाही. जी तक्रार महाराष्ट्र लोकायुक्त आणि उपलोकायुक्त अधिनियम १९७१ नुसार आहे त्या तक्रारीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार कार्यवाही करता येत नाही हा कायदा आहे. आतापर्यंत जिल्हाधिकारी यांनी ज्या प्रक्रिया राबविल्या आणि कार्यवाही केली ती सर्व नियमबाह्य आहे. त्यामुळे त्या निर्देशाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी नगर भाग अहमदनगर यांनी दिलेल्या रिव्हीजन नोटीसा पण नियमबाह्य आहेत. परंतु या सर्व बांबी वारंवार निदर्शनास आणून पण काहीही उपयोग नाही. जे इतिवृत्त निर्देश दिले आहेत ते महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार आहे हे सिध्द करावे नाहीतर सर्व कार्यवाही व रिव्हीजन नोटीसी रद्दबातल करण्यात याव्यात, असे आवाहन या मालमत्ताधारकांनी जिल्हाधिकारी यांना केले आहे.

गृहिणी

आरोग्य

आरोग्यदायी जांभूळ

पिकलेल्या जांभळाला सैंधव लावून त्याला तीन ते चार तास ठेवावे. त्यानंतर ते मळून घ्यावे. मग कपड्यात बांधून टांगून ठेवावे. यातून निघणाऱ्या रसाचे वीस ते तीस थेंब एक चमचा पाण्यात मिसळून घेतल्यास हगवण थांबते.

शिवाय भूक लागते. यात मीठ थोडे जास्त घातल्यास बराच काळ टिकते. त्याला थोड्या काळानंतर उन दाखवावे. म्हणजे ते खराब होत नाही.

पाककला

मैदा-रव्याचे लाडू

साहित्य - मैदा ३ वाट्या, ३ वाटी बारीक रवा, १ वाटी खोवलेले ओले खोबरे, १ चमचा वेलदोड्याची पूड, १५-२० बेदाणे, ३ वाट्या साजूक तूप, ७ वाट्या पिठीसाखर.

कृति - एका कढईत रवा मंद आचेवर भाजून घ्यावा. रवा भाजत आला की त्यात १ वाटी तूप सोडावे म्हणजे रवा फुलून येईल. हा रवा एका ताटात काढून आता मैदा कढईत मंद आचेवर भाजून घ्यावा. त्यावरही भाजत आला की १ वाटी तूप हळूहळू सोडावे. रव्याप्रमाणे मैदाही फुलून येतो.

खोवलेले ओले खोबरेही तूप टाकून मंद आचेवर बदामी रंगावर भाजावे. नंतर खवाही थोडा परतून घ्यावा. आता रवा, मैदा, खोबरे, खवा एकत्र करून व्यवस्थित हलवून घ्यावे. त्यात वेलदोड्याची पूड टाकावी.

१ वाटी राहिलेले तूप घालावे. हे सारे मिश्रण गार झाल्यावर या मिश्रणाच्या पाऊणपट पिठीसाखर त्यात घालावी आणि लाडू वळावेत. लाडू वळताना वर दिसतील असे दोन तीन बेदाणे घालावेत. हे लाडू बल वाढवणारे आहेत.

सल्ला

लग्नपत्रिका व ग्रिटींग कार्डस्चा वापर

जुनी ग्रीटिंग्ज कार्डस, लग्नपत्रिका इ. निरनिराळ्या आकारात कापून मुलांना बुकमार्कप्रमाणे वापरण्यास द्या.

सौंदर्य

* कच्च्या पपईचा किंवा काकडीचा रस चेहऱ्याला लावावा.
* कडुलिंबाची पावडर किंवा पाने वाटून त्यात आंबेहळद व पुदिना रस मिसळून हे मिश्रण १५ मिनिटे चेहऱ्याला लावावे. वाळल्यानंतर चेहरा धुवावा.

वास्तू

* हॉलमध्ये कार्पेट अंथराये. त्यावर एक टि-पॉय अवश्य ठेवावा. त्यामुळे तुमची भेट घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या मनात तुम च्याबद्दल आदराची भावना निर्माण होईल.
* तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय हॉलमध्ये पितळेच्या तसेच, चिनीमातीच्या कुंड्या ठेवू नका.
* सुखी संसाराची रंगवितेली स्वप्ने प्रत्यक्षात उतरतात किंवा धुळीला मिळतात आणि म्हणूनच बेडरूमची रचना व सजावट विचारपूर्वक करावी.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १२ जुलै २०२४

---. शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष.
उत्तरा १६।०९ सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.

राशिभविष्य

मेष : तीव्र वेगाने टाकलेली पावले आपणास प्रतिस्पर्ध्यांकडे ओढतील. महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल. आपल्या इच्छेनुसार कार्य करताना त्रास होईल. इतर लोकांबरोबर चांगला काळ व्यतीत होईल.

वृषभ : पत्नी व मुलांचा सहवास मिळेल. कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतील. सहकर्मी आपल्या सोबत असतील. आनंदाची बातमी मिळेल.

मिथुन : आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. पैसे मिळवण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. मित्रांबरोबर काळ व्यतीत कराल. राजकीय विषयांमध्ये यश मिळेल. मित्रांचा आधार मिळेल.

कर्क : कामासाठी प्रवासाचे योग संभवतात. आरोग्याची काळजी घ्याल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळाल. परस्पर सहकार्यासाठी इतरांना तयार कराल. एखादी बौद्धिक योजना आरंभ करू शकाल.

सिंह : आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. शत्रूंपासून सावध राहावे लागेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. आज आकस्मिक संधी मिळेल.

कन्या : आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्याल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. योग्य संधी मिळाल्यामुळे आपली मनस्थिती चांगली राहील.

तूळ : शत्रूंपासून सावध राहा. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. छोट्या-छोट्या अडचणी येतील. घरगुती मुद्दे आपले लक्ष विचलीत करतील.

वृश्चिक : प्रत्येक व्यक्तीशी मृदू आणि सौम्य वागण्याचा प्रयत्न केल्याने आपली कामे लवकर होतील. एखाद्या कवळक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. जोडीदाराचा सहवास लाभेल.

धनु : संध्याकाळ आपल्यासाठी आनंद आणि उल्हास आणू शकते. मुले त्रास देऊ शकतात. आरोग्य नरम-गरम राहील. माहितीत परिवर्तन होत शकते. आवडीचे काम झाल्याने परिस्थिती आनंददायी राहील.

मकर :आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्याल. नोकरदार मंडळीनो कालजीपूर्वक काम करा. वाहनसुख मिळेल. चाकरमान्यांना लाभ मिळेल.

कुंभ : आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे. आपण कुणापासून प्रेरीत व्हाल. आजचा दिवस छान जाईल. उत्तम भोजनाचे सुख मिळेल. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेले काम पूर्ण होतील.

मीन : आर्थिक मुद्द्यांच्या प्रश्नांबद्दल वाद होणे शक्य आहे. आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. गृहिणी आज असंतुष्ट राहतील. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.

फिल्मीचक्कर क्र. ११४६ सौ. शैलजा कुळकर्णी



आडवे शब्द :- १) ++ +++ +++ मेरे गीत रे मेरे गीत रे (गाणे) ५) ++ मै तो साब बन गया साब बन के कैसा तन गया (गाणे) ८) दिलीपकुमार, निम्मी यांचा एक चित्रपट १०) बीस ++ बाद (चित्रपटाचे नाव) ११) दिलीपकुमार, वैजयंतीमाला, सुचित्रा सेन, मोतीलाल यांचा एक चित्रपट १३) 'बेताब' चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केलेला अभिनेता धर्मेंद्रचा मुलगा

उभे शब्द :- १) ++ + ++ + ++ बहार जाने से उस के जाये बहार बडी मस्तानी है मेरी (गाणे) २) शम्मी 'कपूर, अमिता प्राण यांचा एक चित्रपट ३) ++ मिल गया (चित्रपटाचे नाव) ४) ++ घटा (चित्रपटाचे नाव) ६) दस ++ (चित्रपटाचे नाव) ७) यात दिलीपकुमार आहे ९) राजकुमार, वहिदा रहेमान, मनोजकुमार, शशिकला, ललिता पवार, बलराज सहानी, मेहमूद यांचा एक गाजलेला जुना चित्रपट १२) काही वर्षांपूर्वी 'दूरदर्शन'वर गाजलेली एक हिंदी मालिका

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

सुविचार : मौनाच्या झाडावर शांतीची फळे उगवतात.

मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

बेशुद्ध पडलेल्या व्यक्तीच्या तोंडात हवा फुंकल्याने त्याचा श्वासोच्छ्वास परत सुरू होतो का?

पाण्यात बुडालेल्या व्यक्तीला तारकाळ बाहेर न काढल्यास नाकातोंडात पाणी जाऊन तिचा श्वास बंद झालेला असतो. असे प्रसंग विजेचा शॉक बसलेले, झाडावरून खाली पडलेले किंवा इतर अनेक गंभीर आजारांच्या रुग्णांमध्ये येऊ शकतात. अशा वेळी काय करावे, हे आता पाहू.

व्यक्तीचा श्वासोच्छ्वास १० मिनिटांच्या वर बंद राहिला, तर मेंदूला होणारा प्राणवायूचा पुरवठा बंद होऊन व्यक्ती मरते. त्यामुळे लवकरात लवकर श्वासोच्छ्वास सुरू करणे गरजेचे असते. काही चित्रपटांत तुम्ही पाहिले असेल की, श्वासोच्छ्वास सुरू करण्यासाठी व्यक्तीच्या तोंडात फुंकतात. या प्रसंगातील नाट्य थोडेसे दूर ठेऊन प्रत्यक्ष ही क्रिया कशी करायची, ते आता पाहू. याला 'कृत्रिम श्वासोच्छवास देणे' असे म्हणतात. प्रथम व्यक्तीची मान व डोके मागच्या बाजूला ताणावे. व्यक्तीचे तोंड उघडून त्यांच्या ओठांवर नॅपकीन वा जाडसर कापड ठेवावे. कृत्रिम श्वासोच्छ्वास देणाऱ्या व्यक्तीने दीर्घ श्वास घ्यावा. नंतर रुग्णाच्या ओठांवरील कपड्यावर आपले ओठ टेकवून तोंडाने पूर्ण उच्छ्वास रुग्णाच्या तोंडात सोडावा. असे करताना रुग्णाचे नाक बंद असावे. परिणामी रुग्णाची छाती उंचावलेली दिसेल. काही सेकंदांनी तोंड बाजूला घ्यावे. रुग्णाच्या फुफ्फुसातून या काळात हवा बाहेर पडेल व छाती पूर्वपदाला येईल. ही क्रिया मिनिटाला १४ ते १६ वेळा करावी.

उच्छ्वासातील हवेत कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण जास्त असते. ही हवा रुग्णाच्या फुफ्फुसात जाते. तेथून रक्तात मिसळल्याने रक्तातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढते. याचा परिणाम मेंदूतील श्वसन नियंत्रण केंद्रावर होतो व श्वसन परत सुरू होते. फुफ्फुसातील व छातीच्या स्नायूतील संवेदनक्षम पेशींतून जाणाऱ्या संदेशांचाही श्वसन पूर्ववत चालू होण्यात सहभाग असतो.

कृत्रिम श्वासोच्छ्वासामुळे व्यक्तीचे प्राण वाचू शकतात. यासाठी विशेष उपकरणे, औषधे व तंत्रज्ञान लागत नाही. साहजिकच प्राथमिक उपचार हा उपचार आपण सगळ्यांनी आत्मसात केला पाहिजे.

काळ-वेळ तरी पहा

आंघोळ करण्यासाठी म्हणून एक मुलगा तलावावर उतरून आंघोळ करीत असताना नकळत खोल पाण्यात गेल्याने गटांगळ्या खाऊ लागला. आता आपण बुडून मरणार, याची जाणीव होताच तो '' वाचवा, वाचवा'' असे ओरडू लागला. त्याचा आवाज ऐकून जवळून जात असलेला एक माणूस तेथे येऊन काठावर उभा राहिला. त्याला पाहून '' काका मला वाचवा. पाण्यातून बाहेर काढा, नाहीतर बुडून मरेन मी.'' अशी विनवणी करू लागला.

हे ऐकून तो माणूस म्हणाला, '' अरे तुम्ही अलीकडची मुलं फार शेफारून गेलात. मोठ्या माणसांचे न ऐकता मनमानी करता आणि संकटात सापडताच विनवणी करू लागता. तुमचा मुर्खपणाच याला कारणीभूत आहे यात तिळमात्र शंका नाही.''

त्याचे हे वेळकाढू बोलणे ऐकून मुलगा म्हणाला, ''यहो काका, आधी मला जिवंत तरी वर काढा आणि नंतर काय उपदेश करायचा तो करा. वाटल्यास, मुस्कटात मारा. मी तोंडातून ब्रदेखील काढणार नाही. पण आधी काढा मला वर.''

तात्पर्य : काळवेळ पाहून न वागल्यास लोक टवाळी केल्याशिवाय राहत नाहीत.

जीवन चक्र

डोंगराला भेग पडली नाही. वर्षा म्हणाली, 'काळजी करू नका. काही काळ थांबा व पहा.' महिने निघून गेले व वर्षाची डोंगरावर सतत धार पडत राहिली शेवटी काही वर्षानंतर हवा व पृथ्वीला एक आरोळी ऐकू आली ते पळत पळत डोंगर कड्याजवळ गेले. 'काय झाले?' त्यांनी विचारले. या सर्व वर्षाच्या पाऊस सातत्याने पडत राहिला इतका की माझ्यामध्ये दरी निर्माण झाली. खरोखरीच वर्षाने डोंगरास एक भेग पाडली होती.

''तू असे कसे काय केले?'' दुसऱ्यांनी वर्षास विचारले ही भेग हिंसक रूपाने कापून केली नाही परंतु ही सतत माझ्या होण्याच्या वर्षावामुळे झालेली आहे'', वर्षा म्हणाली.

ही कथा आम्हांस शिकविते की अंतरी आध्यात्मिक उन्नति कशाप्रकारे होत असते. अंतरिक अनुभव अचानकपणे प्रयत्न केल्याने प्राप्त होत नसतात. हे दरसोज केलेल्या सलतच्या प्रयत्नाने प्राप्त होज शकतात. नियमितपणे केलेल्या प्रयत्नाने यश प्राप्त होत असते. जशी म्हण आहे की हळू पण सातत्याने केलेल्या प्रयत्नानेच यश मिळते.

जर आम्ही असा विचार करू की वर्षभरात एकदाच सहा तास ध्यानाभ्यास केल्याने आमचे ध्येय साध्य होईल तर असा आमचा विचार चुकीचा ठरेल.

जेव्हा आम्ही दरोज काही वेळ ध्यानाभ्यासासाठी देऊ तर परलोकास जाणारा मार्ग आमच्यासाठी मोकळा होईल. या तर आम्ही नियमितपणा पाळू या. आम्ही दरोज ध्यानाभ्यासासाठी वेळ काढला पाहिजे.

तेव्हा नियमितपणे पडणाऱ्या पावसाच्या थेंबा-थेंबाप्रमाणे, थोडे थोडे करून आम्ही हळू हळू प्रकाशाच्या क्षेत्रात प्रवेश मिळवू शकू.

(कृपाल आश्रम, अहमदनगर)

शुद्ध जीवन जीने के मंत्र

मैंने मुम्बई में तीन साल एक कम्पनी में म इझ्रोबीयल फर्मेन्टेशन्स पर काम किया। उसके बाद हमने जैविक खाद की फैक्ट्री अपने गाँव गोंदिया में डाली। इस यौगिक खेती के बड़े सुन्दर दो अनुभव हुए। उस समय हमने १२० एकड़ में केला बोया। फल अच्छा लगा मगर अन्त में एक समस्या आ गई। हमारे केले के पेड़ रोज बीच में से टूट कर गिरने लगे। हमने एग्रोनोमिस्ट को बुलाया तो उन्होंने कहा पौधे तनाव में है। कुछ उपाय नहीं, तो उस समय अपनी फसल बचाने का ऐसा कोई उपाय सूझ नहीं रहा था। हमें ये संकल्प आया कि पॉजिटीव वायब्रेशन्स देकर क्या हम परिवर्तन कर सकते हैं? हमने योग का प्रयोग खेती पर शुरू किया। सुबह ४ बजे ४-५ लोग जाकर राउन्ड में चक्कर लगाते हुए परमात्मा पिता से सर्व शक्तियाँ लेकर पौधों को देना शुरू किया। ४-५ दिन में हमें बहुत अच्छा रिजल्ट मिला पेड़ो का टूट कर गिरना रूक गया, धीरे धीरे गिरना बन्द हो गया। जो गिर चुके थे वो तो चले गए। इस प्रकार करीब १०० एकड़ में हमारी वह फसल पूर्णतया बच गई।

दूसरा अनुभव पपीते का है, उस समय पपीते पर बहुत बीमारी आ रही थी। उसमें एक बीमारी थी जो पत्तों को खराब करती है हमने एग्रोनोमिस्ट को बुलाया फसल बचाने के लिए तो कहा कि तीन स्प्रे करने होंगे उसके बगैर ये बीमारी नहीं जा सकती। खेती ज्यादा थी इसलिए तय हुआ कि हमें केमीकल के तीन स्प्रे करने हैं। चूंकि हमारे पास पिछला केले पर योग के प्रयोग का अनुभव था। स्प्रे खरीदे मगर छिड़काव नहीं किया और हमने हर क्यारी में, हर एरिये में जाकर योग के प्रकम्पन फैलाए, उन पेड़-पौधों के साथ जमीन को शक्तिशाली पॉजीटिव वायब्रेशन्स दिये।

पीली पत्तियां जो सूखने को आई थी वह धीरे-धीरे हरी हो गई, फल भी अच्छा आया। उस पपीते को हमने अच्छे दाम में बिक्री किया। ग्रुप फार्मिंगवाले हमारे किसान मित्रों को इन चीज़ों पर विश्वास न होने से हमें मजाक में कहते ठाकुर साहब डूब जाओगे। स्प्रे कर लो। उन्होंने अत्यधिक रसायन का इस्तेमाल किया, उनको फसल तो मिली लेकिन बीमारी और रसायन के प्रभाव से फल खाने योग्य नहीं रहा। उसे व्यापारियों ने खरीदा ही नहीं। पड़ौसी किसानों को पतीता काट कर उसी जमीन में फेंकना पड़ा।

आज १२ वर्षों से मैं शाश्वत यौगिक खेती कर रहा हूँ तब से मेरा विश्वास गहरा हुआ। जब हम जीवाणुओं को प्रसन्नचित्त, सन्तुलित वातावरण देते हैं तो लाभदायक जीवाणुओं में वृद्धि होती है। हमारे संकल्पों की शुद्ध भावनाओं को जीवाणु ग्रहण करते हैं तो उसमें विविध एन्जाइम्स, हार्मोन्स का श्रवण होता है जिससे पौधों में बॉयोकेमीकल चेंजेस आते हैं फलस्वरूप अच्छी सात्विक, पौष्टिक और अधिक उत्पत्ति हमें मिल पाती है। मैं हर किसान को बिना खर्च वाली इस पवित्र पद्धति से कृषि करने की सलाह देता हूँ। इससे सभी प्रसन्न और स्वस्थ बन सकते है। मैने सन् २००८ में ब्रह्माकुमारीज़ के ग्राम विकास प्रमाण द्वारा आयोजित वार्षिक सम्मेलन में भाग लिया था। उस सम्मेलन में रासायनिक खेती के दुष्परिणामों के बारे में जानकर मुझे आश्चर्य हुआ। इसके पहले भी मैं रासायनिक खेती के दुष्परिणामों को जानता तो था परन्तु यहाँ आने से इसके बारे में पूरी समझ मिली। कृषक अगर ऋषि बनकर कृषि करे तो यह बहुत उच्च कोटी की खेती हो सकती है।

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

डॉक्टर : घाबरू नका देशपांडे...खूप छोटे ऑपरेशन आहे.
पेशंट : थॅंक्यू डॉक्टर... पण माझे नाव देशपांडे नाही...!
डॉक्टर : मला माहिती आहे... देशपांडे माझे नाव आहे...!!!

इंग्रजी माध्यमात पदवीधर झालेल्या सुनेने सासुला विचारलं:
'तडफड' म्हणजे नेमके काय असतं ?
सासु शांतपणे उठली, आणि वायफायचा स्विच बंद केला.
म्हणाली... 'घे अनुभव'.

रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्लीत)



तुझी बंधने गळून पडतील
कळीचे फूल होईल
आयुष्याच्या बहारदार समयी
जेव्हा तू मरशील तेव्हाही
हा झरा जीवंतपणे वाहत राहील
मूळ इंग्रजी कविता - रविंद्रनाथ टागोर
मराठी अनुवाद - अरविंद ब्राम्हणे,
भिंगार मो. ९४०३७३४२८१

स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

इस्ट्रोजन कमतरतेमुळे रक्तवाहिन्यांतील चरबीचे प्रमाण वाढते. त्यामुळे अति रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, अर्धांगवायू, मेंदूचे विकार जडण्याची शक्यता वाढते. हाडांमधील कॅल्शिअमचे प्रमाण कमी होते. हाडे ठिसूळ होतात. मणक्यांची व हाडांची झीज होऊन पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखीसारखे त्रास सुरू होतात. छोट्याशा अपघातानंसे लगेच हाड फंक्चर होण्याचे प्रमाण वाढते. त्वाचेत फ्रेंक्चर भरून येण्यास खूप वेळ लागतो. रजोनिवृत्तीमध्ये काही पथ्य पाळल्यास आणण व लक्षणांवर व त्यातून निर्माण होणाऱ्या आजारांवर मात करू शकतो.

रजोनिवृत्तीचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत :
१) नैसर्गिक रजोनिवृती
२) गर्भाशय निर्हरण, बीजकोष काढून टाकणे अशा शस्त्रक्रिया -

१) नैसर्गिक रजोनिवृती : वयाच्या ४२ ते ५० या वयामध्ये बीजकोषातील बीजनिर्मिती थांबल्यामुळे इस्ट्रोजनची कमतरता निर्माण होते व पाळी बंद होते.

२) गर्भाशय निर्हरण, बीजकोष काढून टाकणे : स्त्रीच्या मासिक पाळीसंदर्भातील काही विकारांमध्ये गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया करावी लागते. त्यामुळे पाळी येणे बंद होते. जर ही शस्त्रक्रिया वयाच्या ४० वर्षांच्या आधी केली तर त्यापासून मेनोपॉज सिंड्रोम चा त्रास होऊ नये म्हणून एका बाजूचे बीजकोष ठेवणे गरजेचे असते. यामुळे स्त्रीशरीरात प्रत्येक महिन्याला बीजनिर्मिती होते व जरी पाळी आली नाही, तरी त्यापासून निर्माण होणाऱ्या रजोनिवृत्तीच्या लक्षणांचा त्रास कमी जाणवतो. परंतु काही कारणास्तव दोन्ही बीजकोष काढावे लागले तर मेनोपॉज सिंड्रोमचा म्हणजेच रजोनिवृत्तीचा त्रास जास्त जाणवतो.

आधुनिक काळात स्त्रीला कुटुंबाबरोबरच नोकरीची जबाबदारी पार पाडतानां तारेवरची कसरत करावी लागते. त्यामुळे हार्मोन्सचे असंतुलन होते. त्याचा परिणाम होऊन शारीरिक व मानसिक बदल होतात त्यामुळे काही स्त्रियांचे बीजकोष अकार्यक्षम होतात. त्याचा परिणाम म्हणून पी.सी.ओ.डी. हा आजार बऱ्याच स्त्रियांना होतो. यामुळे वंध्यत्व, स्थूलता यांसारख्या व्याधी जडतात व चाळिशीच्या आतच काही स्त्रियांमध्ये रजोनिवृत्ती येते.

रजोनिवृत्ती नैसर्गिक असो किंवा अनैसर्गिक असो यांमधून पाळी बंद होणे टाळू शकत नाही परंतु योग्य आहारविहार, व्यायाम, औषधी योजना यांच्या वापराने रजोनिवृत्तीचा त्रास कमी करू शकतो.

(क्रमश:)

– डॉ. शारदा निर्मल-गहांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

११ जुलै : जागतिक लोकसंख्या दिन

कदाचित सोशल मीडियावरचे कुशल उत्साही कलाकार या दिवसाचाही हातेर दिवसासारखा दिवस छालून हॅपी वर्ल्ड पॉप्युलेशन डे, सारख्या शुभेच्छाही देत सुटले असतील. परंतू आज निश्चितच हा दिवस गंभीर आत्मचिंतन करण्याइतपत चिंताजनक अवस्थेवर उभा आहे.

युनोने १९८९ पासून हा दिवस साजरा करायला नव्हे तर पाळायला सुरुवात करण्याचा मुळ हेतू लक्षात घ्यायला हवा.

सन १९२७ मध्ये जगाची लोकसंख्या २०० कोटी इतकी होती, ती १९६० मध्ये ३०० कोटी झाली. या कालावधी दरम्यान १९३९ चे दुसरे महायुध्द, भयानक मलेरिया, प्लेग यासारख्या अनेक साथीच्या आजारांमुळे १५.५ कोटी लोक मरण पावल्याची नोंद आहे. त्यापैकी ८.५ कोटी लोक १९४० ते ४५ या पाच वर्षात केवळ दुसऱ्या महायुध्दात मारले गेले होते आणि त्यापैकी एकट्या जर्मनीमधे ज्यूरहू १ कोटी लोक मारले गेले होते.

या सर्व प्रतिकूल अवस्थेत ही जगाच्या लोकसंख्येमध्ये १९२७ ते १९६० या ३३ वर्षात १०० कोटींची भर पडून ती १९६० मध्ये ३०० कोटी झाली हे विशेष.

त्यानंतरच्या ६० प्रगत वर्षात तोच वाढीचा वेग कायम राहून आज जगाची लोकसंख्या ७५० कोटींवर धडकली आहे.

हे झाले जगातल्या बाबतीत... पण आपला देश तर याबाबत अतिचिंताजनक अवस्थेमधे पोहचल्याचा युगोचा अहवाल आहे. इतर देशांचे भौगोलिक क्षेत्रफळ विस्तार लक्षात घेता लोकसंख्येची प्रचंड घनता हा आपला अतिशय चिंताजनक मुद्दा आहे. सामान्यांना समजेल अशा भाषेत सांगायचे म्हंटले तर एका स्क्वटरवर सात जण बसवले तर स्क्वटरची, इंजिनाची व मापरांची ही जी अवस्था असेल तीसच्या भारताची आहे.

बाकी आघाडीच्या काही देशांचे तसे नाही तरीही ते एका मोपेडवर दुसरी व्यक्ती छोट्या बाळाला जरी घेऊन बसली तरी त्यांना चिंता वाटते. उपाययोजना आखल्या जातात व निव्वळ देशप्रेमामुळे त्या अंमलातही आणण्यात येत आहेत आणि आमची स्क्वटरवर अजून सातव्याच्याही मांडीवर आठवा बसवायच्या तयारीत आहोत.. हा फरक आहे.

जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी भारताचे क्षेत्रफळ अवघे अडीच टक्के आहे आणि लोकसंख्या मात्र जगाच्या लोकसंख्येच्या १८ टक्के आहे, हा मोठा विरोधाभासच विकासाचा मोठा अडथळा आहे.

जागतिक लोकसंख्येचा पार्श्वभूमीवर जो अहवाल आज युनोमधे मांडला, त्यानुसार जगात दरवेळ ३ लाख ६० हजार जन्म होत आहेत आणि दरवेळ १ लाख ५२ हजार मृत्यू होत आहेत. म्हणजेच प्रत्येक एका मिनिटाला २५० जन्म होत आहेत आणि प्रत्येक मिनिटाला १०५ मृत्यू होत आहेत. या आकडेवारी वरुन दरवर्षी जगातल्या लोकसंख्येत ८५ लाखांची भर पडते आहे.

यामध्ये अर्थातच दुर्दैवाने आपला देश लोकसंख्या घनतेबाबत आघाडीवर आहे. एका स्क्वटरवर ७ माणसं...

याबाबत चीन देखील आपल्याला उजवा ठरतो कारण त्यांच्या देशाचे क्षेत्रफळ आपल्यापेक्षा लिप्पट मोठे आहे. म्हणून त्यांची लैकसंख्या घनता फक्त १४७ व्यक्ती प्रति चौ. किलोमीटर आहे तर आपली घनता ४१२ व्यक्ती प्रति चौ. कि.मी आहे.

अमेरीका ९९ व्यक्ती प्रति चौ.कि.मी., रशिया फक्त ९, फ्रान्स ११८, जर्मनी २३३ तर पाकीस्तानही आपल्याला उजवा आहे. २४१ व्यक्ति प्रति चौ कि मी.यावरुन आपण कुठे चाललो आहोत हे अधिक सांगण्याची गरज नाही.

आजवर अनेक सत्ता आल्या व गेल्या. गरीबी हटाव, कुटुंब नियोजन यासारखे प्रयोग फक्त ५ टक्के बुध्दीजीवांनी अवलंबले. पण लोकसंख्येचे आभाळ फाटतच चाललेय.

या सर्व गोष्टी लक्षात घेऊन या वर्षीची जागतिक लोकसंख्या दिनाची थिम... **Family planing is a human right** अशी सुचक ठरवण्यात आली आहे. यावरुनच समजले जावे की हा दिवस साजरा करायचा नसुन पुढच्या पिढ्यांसाठी गंभीरतेने पाळायचा आहे.

लेखक – **सुहास मुळे**, अध्यक्ष जागरुक नागरिक मंच, अहमदनगर मो. ९८२३७२२२१२

(आकाशवाणी व दूरदर्शन संहिता लेखक)

लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

वाढत्या लोकसंख्येविषयी लोकांना जागरुक करण्यासाठी जागतिक लोकसंख्या दिन दरवर्षी ११ जुलै रोजी साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा मुख्य उद्देश असा आहे की, जगातील प्रत्येक व्यक्तीने वाढत्या लोकसंख्येकडे लक्ष दिले पाहिजे आणि लोकसंख्येला नियंत्रणात ठेवण्यात आपली भूमिका निभावली पाहिजे. वाढत्या लोकसंख्येने जगातील बऱ्याच देशांसमोर मोठ्या समस्येचे रुप धारण केले आहे. त्याचा सर्वात जास्त तोटा विकसनशील देशांना होत आहे. लोकसंख्या स्फोट ही एक गंभीर चिंता आहे. या दिवशी लोकांना कौटुंबिक नियोजन, लिंग समानता, मानवी हक्क आणि महिला आरोग्य याबद्दल माहिती दिली जाते

आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात अब्जा पर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे.

मागील वर्षीच भारताने चीनला मागे सारुन जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. मागील वर्षीच्या सुरवातीलाच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारुन सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. मागील वर्षी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येवर अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे. म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वतंत्र झाला तेव्हा अवघी लोकसंख्या तीस कोटी होती. याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आण्ण्यासाठी शासनस्तरावरुन पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम जन्म देणारे महामाणही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीढिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षाच्या लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही. त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वांनाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आज्य घालावाच लागेल हे नवीन पीढिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती ह्वावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

– महावीर पोखरणा

स्वर झंकारच्या वतीने 'स्वर मल्हार संगीत महोत्सवाचें' आयोजन

नगर – ह्यायोलीन अवॅडमी अहमदनगर व स्वर झंकारच्या वतीने 'स्वर मल्हार संगीत महोत्सवाचे' आयोजन नगरच्या कलारसिकांसाठी करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १४ जुलै रोजी सायंकाळी ५:३० वाजता माऊली सभागृह, सावेडी रोड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सतार वादक पद्मश्री उस्ताद शाहिद परवेज खान आणि पोहित अतुलकुमार उपाध्ये यांची सतार आणि ह्यायोलिन वादनाची जुगलबंदी सादर केली जाणार आहे. त्यांना तबला साथ तबलावादक मुकेश जाधव करणार आहे.

पद्मश्री उ.शाहिद परवेज खान यांनी देश-विदेशातील अनेक संगीत महोत्सवातून आपले वादन सादर केले आहे. भारतातील सर्व प्रमुख महोत्सव, अमेरिका, युरोप, कॅनाडा, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, रशिया अशा देशातून त्यांचे कार्यक्रम झालेले आहेत. शाहीद परवेज आपल्या स्वतंत्र वादनशैलीसाठी ओळखले जातात. गायकी अंगाबरोबर तंत्रकारी अंगाचा मिलाफ असलेल्या त्यांच्या वादनशैलीत, गायकी अंगारोबत लयीचे

पं. अतुलकुमार उपाध्ये | शाहिद परवेज खान | मुकेश जाधव

विविध प्रकार पहायला मिळतात.

संगीत महामहोपाध्याय पंडित अतुलकुमार उपाध्ये हे पंडित भास्कर बुवा बखले घराण्यातील असून त्यांच्या वादनशैलीवर पंडित श्रीधर पार्सेकर आणि यहुदी मेहुनविन यांच्या वादनाचा प्रभाव आहे पंडित अतुल कुमारजी यांचे आजपर्यंत देशविदेशात अनेक ठिकाणी कार्यक्रम झाले आहेत यात अमेरिका, युरोप, जर्मनी, फ्रान्स येथे तसेच सवाई गंधर्व महोत्सव येथे पंडितजींनी सेवा रुजू केली आहे. पंडित विश्वमोहन भट, रोणू, मुजुमदार, पंडित दयाशंकर अशा अनेक दिग्गज कलावंतांबरोबर जुगलबंदीचे कार्यक्रम सादर केले आहेत.

या कार्यक्रमात गायन मनु श्रीवास्तव यांचे स्वतंत्र गायन होणार असून त्यांच्या शिष्या संयुक्ता अमरनाथ आणि विद्या देसाई यांच्या गायनाची जुगलबंदी ऐकण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. नागरच्या सुजाण संगीतरसिकांसाठी ही सुवर्णसंधी आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. अशी माहिती ह्यायोलिन अवॅडमी अहमदनगरचे संचालक महेश लेले यांनी दिली.

शेख शाहीन आसिफ मुलाणी यांना ३ सुवर्ण पदके

नगर – दर्गादायरा अहमदनगर येथील शेख शाहीन आसिफ मुलाणी यांनी कमवा आणि शिका अशाप्रकारे स्वकष्टाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बी कॉम २०२२ (पुणे, अहमदनगर, नाशिक) सर्व विषयात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल पुणे विद्यापीठाकडून शेख शाहीन आसिफ मुलाणी यांना ३ सुवर्ण पदके देऊन सन्मानित करण्यात आले. शाहीन या लष्करी सेवानिवृत्त मरहूम सिराजुद्दीन मुलाणी यांची नात आहे.

'आरटीओ' विभाग दंड लावण्यासाठी नसून चालकांनी नियम पाळावे यासाठी कार्य करते

विनायक साखरे यांचे प्रतिपादन; एसा नॉलेज सीरिज अंतर्गत रोड अपघात सुरक्षिततेबाबत जनजागृती या विषयावर आरटीओ विभागाकडून कार्यशाळा

नगर – भरताल अपघाताने मृत्यू झालेल्यांची संख्या सर्वात जास्त असून ही थांबवण्यासाठी समाजात वास्तुकीबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. सध्या मोबाईलच्या अतिवापरामुळे दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत आहे, या अपघातात कर्ता पुरुष दुर्दैवी मृत्युमुखी पडल्यास अनेक कुटुंब उद्धवस्त झालेले दिसून येत आहे, अनेक पालक आपल्या अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्यासाठी देतात यामुळे अपघाताचा धोका निर्माण होत आहे, हेल्मेट वापरण्याचे महत्व सांगून आपल्या मुलांना जेव्हा लायसन्स काढतील तेव्हाच गाडी चालवायला देण्याबाबत सांगितले. आपल्या गाडीचा इन्शुरन्स वेळेवर काढल्याने त्याचा होणारा फायदा, अपघात सांगून येत नाही त्यासाठी आपण काळजी घेणे आवश्यक आहे. गाडी चालवताना आपल्यामागे आपले कुटुंब आहे याचा विचार करुन वेगावर नियंत्रण ठेवावे. प्रादेशिक परिवहन विभाग हा दंड लावण्यासाठी नसून आपण वाहन चालवताना काळजी घ्यावी आणि स्वतः तसेच रोड वरील इतर सुरक्षित राहावेत यावे नियम पाळणे यासाठी आहे. याबाबत आपल्या संस्थेच्या माध्यमातून जन जागृती करावी, असे आवाहन असी.आर टी ओ विनायक साखरे यांनी केले.

एसा नॉलेज सीरिज अंतर्गत रोड अपघात सुरक्षिततेबाबत जनजागृती या विषयावर आरटीओ विभागाकडून आयोजित कार्यशाळेप्रसंगी असिस्टंट आरटीओ विनायक साखरे.समवेत इतर अधिकारी, आर्किटेक्ट इंजिनियर्स ॲण्ड सर्व्हेअर्स पदाधिकारी, सदस्य. (छाया – लहु दळवी)

आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲंड सर्व्हेअर्स असो अहमदनगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आणि आर टी ओ विभाग अहमदनगर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या रोड सेफ्टी अवेअरनेस या विषयावर कार्यशाळेत विनायक साखरे (असि. आर टी ओ) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मोटार वाहन निरीक्षक सावंत पाटील, अध्यक्ष रमेश कार्ले, उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे, सचिव प्रदिप तांदळे, संचालक यश शहा, प्रितेश पाटोळे, प्रकाश जैन, एस यू खान, राजकुमार मुनोत, आशिष मुथीयान, सचिन डागा, किरण ठकले, संजय चांडवले, विकार काझी, संकेत पादिर, सतीश कांबळे, कैलास ढोरे, विजय पादिर, शिरीष कुलकर्णी आणि संस्था सभासद उपस्थित होते.

यावेळी असि. इन्स्पेक्टर मोटार व्हेइकल सूरज उबाळे यांनी आपल्या झालयास त्या व्यक्तीस मदत करणे हे आपले प्राथमिक कर्तव्य आहे स्पीड गन मुळे आपण नियमापेक्षा जास्त वेगात गाडी चालवल्यास दंड लागतो. जास्त वेग असेल तर अपघात होण्याचे तसेच अपघातात इजा होण्याचे प्रमाण जास्त असल्याने आपल्या वाहनाच्या वेगावर नेहमी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे असे सांगत वेगवेगळे ट्रॅफिक साइन, आर टी ओ मधील विविध नियम, कायद्यातील तरतुदी आणि गुन्हा झालयावर होणाऱ्या शिक्षा, गाडी चालवताना घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले.

यावे वेळी बोलताना संस्था अध्यक्ष रमेश कार्ले यांनी या उपक्रमाच्या माध्यमातून आपणास वाहतूक नियम समजणे, वाहन वापरताना घ्यावयाची काळजी, लायसन्स ऑनलाइन काढणे बाबत सविस्तर माहिती मिळाली आहे. आपण स्वतः हे नियम पाळावेच परंतु याचा जास्तीत जास्त प्रसार करून एक सामाजिक काम करणेबाबत आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन आर टी ओ अहम दनगर विनोद सगरे यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

यावळी संस्थेकडून शहरातील सर्व चौकातील सिग्नल चालू करणे तसेच ओवर ब्रीज संपतात त्या वळणावर मिरर लावणे याबाबत आग्रही विनंती केली

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक यश शहा यांनी केले तर सचिव प्रदिप तांदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या राज्य उपाध्यक्षपदी राजेंद्र बुंदेले यांची नियुक्ती करुन माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या हस्ते पत्र प्रदान करण्यात आले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी राजेंद्र बुंदेले

नगर – राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राज्यस्तरीय संमेलन नुकतेच पुणे येथे उत्साहात झाले. अध्यक्षस्थानी माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप होते. या संमेलनात राज्यस्तरीय कार्यकारिणी जाहीर करुन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र दिले. यामध्ये अहमदनगरचे राजेंद्र बुंदेले यांची राज्याच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करुन पत्र प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी आमदार महेश लांडगे, चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय सचिव ज्ञानेश्वर कांबळे, कार्याध्यक्ष भानुदास विसावे, उपाध्यक्ष बाबा कांबळे, डॉ. मेहबूबभाई सय्यद, महिलाध्यक्षा सरोज बिसूरे, प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, डॉ. शांताराम कारंडे, प्रदेश निरीक्षक प्रा शशिकांत सोनवणे, राष्ट्रीय सचिव दत्तात्रय गोतीसे, उपाध्यक्ष आनंद गवळी, अनिल कानडे, युवक प्रदेशाध्यक्ष रवींद्र खैरे आदी उपस्थित होते.

राजेंद्र बुंदेले हे गेल्या चोवीस वर्षापासून राष्ट्रीय चर्मकार महासंघाशी एकनिष्ठ असून, शहर सचिवापासून ते जिल्हाध्यक्ष, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष अशा विविध पदावर काम केले आहे. आता राज्याच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड म्हणजे महासंघात त्यांनी केलेले प्रामाणिक कार्याची पावती होय.

महासंघाच्या प्रत्येक कार्यात तसेच चर्मकार समाजाच्या अडीअडचणी सोडविण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा दिसून येतो. श्री. बुंदेले यांचे कार्य फक्त चर्मकार समाजापुरते नसून सर्व सामाजिक कार्यात ते हिरीरीने भाग घेतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन बबनराव घोलप यांनी त्यांची राज्याच्या उपाध्यक्षपदी निवड करून त्यांच्या कार्याला न्याय दिला आहे.

नियुक्तीनंतर राजेंद्र बुंदेले म्हणाले, राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून आपण प्रामाणिकपणे समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. पुढील काळातही सर्वांना विश्वासात घेऊन नि:स्वार्थपणे समाजासाठी कार्य करत राहू, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास राष्ट्रीय-राज्य पदाधिकाऱ्यांसह शोभाताई कानडे, लताताई नेटके, रघुनाथ आंबेडकर, भाऊसाहेब पवार, सुखदेव केदार, गणेश गोरे, पोपट शेटे, प्रतिभाताई धस आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रा. रवींद्र काळे यांना के. हरि गणेश फडके पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा नगरच्या सत्कार करण्यात आला.

प्रा. रवींद्र काळे यांना मानाचा के. हरि गणेश फडके पुरस्कार

नगर – प्रा. रवींद्र काळे हे अनेक वर्षांपासून नगरच्या रंगभूमीवर महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून कार्यरत आहेत. त्यांना अनेक मराठी, हिंदी नाटकांसाठी राज्य शासनाकडून अभिनय, दिग्दर्शन, लेखनासाठी पुरस्कार मिळालेले आहेत. शिवाय त्यांचे साहित्य वर्तुळात ही चांगले काम आहे. या अनुषंगानेच त्यांना हा मानाचा के. हरि गणेश फडके पुरस्कार प्राप्त झाला आहे.

पुणे मराठी ग्रंथालय ही सव्वाशे वर्षापासून साहित्यिक, सांस्कृतिक आणि कलेच्या क्षेत्रात कार्यरत असलेली लौकिक प्राप्त संस्था आहे. ही संस्था फक्त नगर आणि पुणे या विभागात अभिनय क्षेत्रात कार्यरत असलेल्या अभिनेत्यास पुरस्कार देऊन त्यांना प्रेरणा देण्याचे कार्य करते. आजवर अनेक दिग्जांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनेते प्रा. रवींद्र काळे यांनी नगर शहरातील रंगभूमीवर कार्यरत असलेल्या सर्व नव्या जुन्या कलावंतांबद्दल कृतज्ञ असल्याचे सांगितले.

शिक्षण : परिवर्तनाचे साधन

मानवाचे राहणीमान उंचावणाऱ्या या शतकात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या पंखांनी मानवाची समृध्दीच्या नभात गरुडझेप केवळ शिक्षण या घटकांमुळे शक्य झाली आहे. आज अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलभूत गरजांप्रमाणेच शिक्षण ही सुध्दा मुलभूत गरज बनली आहे आणि ही गरज पूर्ण करण्यासाठी सर्वांतोपरी सर्व स्तरांतून प्रयत्न होत आहेत.

शिक्षण या संकल्पनेकडे समाज परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जाते. शिक्षणामुळे जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये अमूलाग्र बदल घडून आलेला दिसतो. पूर्वीच्या काळी शिक्षण ही प्रक्रिया लेखन वाचन या क्षमतापूरतीच मर्यादित होती, मात्र ही संकल्पना आज विस्तारत आहे. शिक्षणामुळे आज मानवाला अशक्यप्राय वाटणाऱ्या अनेक गोष्टी सहज सुलभ होत आहेत. मानवाला गरुडपंख देणाऱ्या या शिक्षणामुळे सामाजातील प्रत्येक घटक क्रियाशील होण अपेक्षित आहे. मानवी जीवनाचे आधार असणाऱ्या प्रत्येक घटकांवर शिक्षणाचा प्रभाव दिसून येतो. जसे व्यवसाय, शेती, शेअर बाजार, वाणिज्य, वैद्यकिय, अवकाश असो किंवा अगदी शेती, घरकाम, मजुरी प्रत्येक घटक शिक्षणामुळे प्रभावित झालेला दिसून येतो. विनोबा भावेंच्या मते 'सुज्ञ व निद्दिस्त शक्ती जागृती करण्याचे एक साधन महणजे शिक्षण होय (कुंडले. १९९६) तसेच महात्मा फुले हे ही शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना अतिशय सुंदर शब्दांत म्हणतात की,

विद्येविना मति गेली। मतीविना निती गेली ।। नितिविना गति गेली। गतिविना वित्त गेले ।। वित्तविना शुद्र खचले। इतके अनर्थ एका अविद्येने फाले ।।

शिक्षणाचे मानवी जीवनातील महत्त्व महात्मा फुले यांनी मार्मिकपणे पटवून दिले आहे. (ठोंबरे, २०१६) शिक्षण हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे, त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी सर्व घटकांकडून प्रयत्न होत आहेत. मात्र असे असताना ही समाजातील काही घटक आज ही कमी अधिक प्रमाणात दुर्लक्षित असल्याचे निदर्शनास येते.

उदा. दिव्यांग, महिला, आदिवासी समाज, अल्पसंख्याक घटक या पासून वंचित राहू नये यासाठी विविध योजना राबविण्यात आल्या किंबहुना अजूनही येत आहेत.

अविकसित, दुर्लक्षित अशा अनेक घटकांपैकी एक घटक म्हणजे आदिवासी समाज या समाजाला प्रगत समाजाशेजार पुढे नेण्यासाठी शिक्षण हा एकमेव पर्याय असून त्यासाठी शासनातर्फे विविध मार्गांचा अवलंब करून दिला जात आहे. या संदीचाच एक भाग म्हणजे 'आश्रमशाळा' या आश्रमशाळा आज दुर्गम, आदिवासी समाजातील मुलांसाठी व मुलींसाठी शिक्षण प्राप्त करण्याचे महत्त्वपूर्ण साधन ठरले आहे.

विविधतेने नटलेल्या या देशात प्रत्येक समाजातील, प्रत्येक घटकाला विकासाची समान संधी भारतीय राज्यघटनेने उपलब्ध करून दिली आहे. अनेक हक्क राज्यघटनेने दिले आहेत, असे असतानाही या हक्कांचा, या संधीचा लाभ या समाजातील दुर्लक्षित घटक घेतातच असे नाही.

आदिवासी समाज हा आजही 'दुर्लक्षित समाज' म्हणून ओळखला जातो. या समाजाला प्रगत समाजाच्या बरोबरीने वाटचाल करण्यासाठी शिक्षण हा एकमेव पर्याय असून या पर्यायाच्या उपलब्धतेसाठी आज सर्वांतोपरी प्रयत्न होताना दिसत आहेत मात्र असे असतानाही काही प्रमाणात हा समाज आज ही विकसित या व्याख्येपासून पलिकडे आहे.

– सौ. पुष्पा शिवराम लांडे



जि.प.प्रा. शाळा शिळवंडी, ता.अकोले, जि.अहमदनगर
मो.बा. ९७६५१७९३९४

कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना कै. डॉ. गंगाधर मोरजे स्मृतीप्रित्यर्थ पद्मगंगा फाउंडेशनचा राज्यस्तरीय लोकगंगा साहित्य पुरस्कार प्राचार्य अनिल सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली व प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, प्रा. डॉ. मुसा बागवान, प्रा. डॉ. संदीप सांगळे, डॉ. सुधाकर शेलार यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

राज्यस्तरीय लोकगंगा साहित्य पुरस्कार कवयित्री सरोज आल्हाट यांना प्रदान

नगर – येथील कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना त्यांच्या 'अनन्यता ' या काव्य संग्रहासाठी कै. डॉ. गंगाधर मोरजे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, पद्म गंगा फाउंडेशन रुग्ण वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय लोकगंगा साहित्य पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

प्राचार्य अनिल सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, प्रा. डॉ. मुसा बागवान, प्रा.डॉ. संदीप सांगळे, डॉ. सुधाकर शेलार आदी उपस्थित होते.

सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. सरोज आल्हाट यांचे यापूर्वी अर्ध्यूच्या पाऊलखुणा, कविता तुझ्या नि माझ्या, सखे असे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'अनन्यता' या चौथ्या काव्यसंग्रहास हा पुरस्कार देण्यात आला.

महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी डॉ. अशोक चंगेडे, व्हा. चेअरमनपदी शांतीलाल मुनोत

भिंगार – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या. भिंगार, या संचेची नुकतीच संचालक मंडळाची बिनविरोध निवडणूक होऊन १० जुलै रोजी उपनिबंधक कार्यालतील अध्याशी अधिकारी ए. ए. शेख यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन म्हणून डॉ. चंगेडे अशोक शांतीलाल आणि व्हा. चेअरमन म्हणून मुनोत शांतीलाल माणकचंद यांची बिनविरोध निवड झाली.

चेअरमन व व्हा. चेअरमन पदाची बिनविरोध निवड व्हावी, यासाठी पुढील प्रस्थापित व नूतन संचालक यांनी प्रयत्न केले. भंडारी सुंदरलाल, चोरडिया प्रकाश, सपकाळ संजय, बोरा कांतीलाल, भंडारी विनोद, शिंगवी नितीन, भंडारी शुशील, गुंदेचा पवन, मुनोत संजय (रनी), गांधले सुदाम, पवार मारुती, सौ. बोरा वैशाली, शिंगवी अंजली, पतके किरण व हिरणवाळे शंकरराव या सर्वांनी विचारमंथन करुन चेअरमन व व्हा. चेअरमन यांची बिनविरोध निवड केली.

याकामी उपनिबंधक अधिकारी ए. ए. शेख यांनी सहकार्य केले त्यांचे सर्व संचालक यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच नूतन चेअरमन डॉ. चंगेडे अशोक शांतीलाल व व्हा.चेअरमन मुनोत शांतीलाल माणकचंद यांचा सत्कार उपस्थित सर्व संचालक मंडळ यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन पुढील भविष्यात महेश पतसंस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे कर्मचारी वृंद यांनीसुद्धा नूतन चेअरमन व व्हा.चेअरमन यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येऊन शुभेच्छा दिल्या.

डॉ. चंगेडे अशोक यांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितले की, मागील आर्थिक पाच वर्षात चेअरमनपदी असतांना सर्व संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग यांच्या सहकार्याने संस्था सुस्थितीत आणल्यामुळे त्याची पोहोच पावती म्हणून संचालक मंडळाने चेअरमन पदी माझी बिनविरोध निवड केली त्याबद्दल संचालक व कर्मचारी वृंदाचा मी आभारी आहे व येथून पुढेही संचालक व कर्मचारी अशीच साथ देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

नगरमध्ये सोमवारी संगीत वारीचे आयोजन

व्याख्याते गणेश शिंदे, गायिका सन्मिता शिंदे यांचा सहभाग

नगर – अवघा रंग एक झाला....प्रबोधन परिवार व नगर मधील सामाजिक संस्थांच्या पुढाकाराने दरवर्षी आषाढीवारीच्या निमित्ताने वैविध्यपूर्ण अशा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गतवर्षी 'मोगरा फुलला' या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवन चरित्रावर आधारित संगीतमय कार्यक्रमाने नगरकरांची मने जिंकली होती. यावर्षी महाराष्ट्रातील व्याख्याते व निरूपणकार गणेश शिंदे व गायिका सन्मिता शिंदे यांचा सहभाग असलेले 'अवघा रंग एक झाला' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.





महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. प्रत्येक जाती धर्मात जन्माला आलेल्या संतांनी मानवतेचा संदेश समाजाला दिला. जातीभेदाचे रंग अधिक गर्द होत असताना संतांचा सामाजिक एकतेचा संदेशच येणाऱ्या काळात तरुणाईला दिशा देऊ शकेल, या उद्देशाने संत वाङ्मयाच्या माध्यमातून या प्रबोधन पर संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे अहमदनगर जिल्हा नाट्य परिषदेचे अध्यक्ष अमोल खोले यांनी सांगितले.

झी टॉकीजच्या माध्यमातून व्याख्याते गणेश शिंदे अवघ्या महाराष्ट्राला परिचित झाले. घराघरात पोहोचले आहेत. तरुणांमध्ये त्यांच्या वक्तृत्वाने त्यांनी विशेष स्थान मिळवले आहे. तसेच सन्मिता शिंदे यांनी 'सुर नवा ध्यास नवा' या कलर्स वाहिनीवील कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या महाविजेता ठरल्या. शिंदे दाम्पत्याचे मूळ पारगाव (ता. अहमदनगर) असून, त्यांनी नगरकरांसाठी या संगीत वारीची संधी उपलब्ध करून दिली असल्याची माहिती खोले यांनी दिली. आषाढी वारीच्या निमित्ताने महाराष्ट्रातील वातावरण भक्तीने झालेले असताना नगरकरांसाठी ही सुवर्णसंधी आहे. ५१ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता माळजी संकुल, सावेडी रोड, अहमदनगर या ठिकाणी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे नगरकरांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य आहे. तथापि, त्यासाठी प्रवेश पास घेणे बंधनकारक आहे.

मोफत पास मिळण्यासाठी रसिकांनी किरण गवते ८८०५०५८८९९, जनार्दन लिपणे ९६७२६२९८९८ किंवा सतीश फुलारे ८८८८८८६४४१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

रसिक श्रोत्यांनी या संगीत वारीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक समितीमधील धनेश खत्री, तुषार अंबाडे, किरण गवते यांनी केले आहे.

तक्रारदारास नुकसानभरपाई देण्याचे ग्राहक आयोगाचे विमा कंपनीला आदेश

नगर – तक्रारदार वाहीद अहमदलाल कुरेशी यांनी त्यांच्याकडे असलेल्या आयशर टेम्पोचा विमा रॉयल सुंदरम विमा कंपनीकडे रितसर उतरवला होता. सदरचे वाहन अ.नगर ते हैद्राबाद असा प्रवास करत असताना हुमनाबाद जवळ २०–१२–२०१८ रोजी रात्रीचे वेळी अपघातग्रस्त झाल्या सदर वाहनाचे प्रचंड नुकसान झाले.त्याबाबत तक्रारदार यांनी सदर विमा कंपनीकडे रितसर नुकसान भरपाई मिळणे बाबत दाद मागितली. तथापि सदर विमा कंपनीने नुकसान भरपाई तक्रारदारास दिली नाही. तद्नंतर तक्रारदार यांनी अॅड. सचिन पाठक यांच्या मार्फत ग्राहक संरक्षण कायदा अंतर्गत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांच्याकडे ग्राहकांस दूषित सेवा दिली व विमा रक्कम न देता फसवणूक केली या आधारावर अर्ज दाखल केला.

सदर अर्जावर कामकाज होवून विमा कंपनीने तक्रारदारास दूषित सेवा दिली असे सिध्द केले. त्यामुळे आयोगाने नुकताच निकाल देवून सदर विमा कंपनीस श्री. कुरेशी यांना नुकसान भरपाईपोटी ३,५४,२६२ व त्यावर १०% व्याज देण्याचा आदेश केला. तसेच तक्रारदारांस मानसिक व आर्थिक त्रासापोटी ३०,००० रुपये देण्याचा आदेश केला आहे. सदर तक्रारदारास नुकसान भरपाई मिळवून देणे कामी ॲड. सचिन पाठक यांनी केलेला युक्तिवाद महत्त्वाचा ठरला. विमा प्राप्त होईपर्यंत गोडगोड बोलून विमा उतरवला जातो. परंतु नुकसान झाल्यास विमा कंपनी रक्कम देण्यास टाळाटाळ करतात या गोष्टी व इतर महत्वपूर्ण मुद्दे आयोगासमोर आणून दिल्याने आयोगाने तक्रारदारास नुकसानभरपाईचा आदेश दिला आहे.

बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनतर्फे २० व २१ जुलै रोजी राज्यस्तरीय कथाकथन व काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन

नगर – अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनतर्फे राज्यस्तरीय आंतरशालेय कथाकथन स्पर्धा व २१ जुलै रोजी राज्यस्तरीय खुल्या स्वलिखित मराठी काव्य वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून कथाकथन स्पर्धेचे हे सलग २१ वे तर काव्यवाचन स्पर्धे चे हे ११ वे वर्ष आहे. २० व २१ जुलै रोजी या स्पर्धा होणार आहेत, अशी माहिती अहमदनगर बॅकस्टेज आर्टिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अमिनेते आणि दिग्दर्शक मिलिंद शिंदे यांनी दिली.

गीतांजली कुलकर्णी

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ २१ जुलै रोजी रायसाहेब पटवर्धन सभागृहात येथे होणार आहे. यावेळी अभिनेत्री गीतांजली कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असल्याचे स्पर्धा प्रमुख मंगेश देवचके यांनी सांगितले.

स्व. सेठ शामसुंदरजी बिहाणी (बंगडीवाला) स्मृती कथाकथन स्पर्धा २ गटात होणार असून ५ वी ते ७ वी या लहानगटासाठी ७ मिनिटे तर ८ वी ते १० वी या मोठ्या गटाकरिता सादरीकरणाची वेळ १० मिनिटे आहे. दोन्ही गटात मिळून सांघिक विजेतेपदाचा करंडक शालेय देण्यात येईल. ही स्पर्धा भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथील विश्रामबाग शाळेत सकाळी ११ वाजता होणार आहे. या स्पर्धांसाठी प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे रुपये ५०००, ३०००, २००० रोख, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह व पाच उत्तेजनार्थ अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी ५७ जुलै पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

२१ जुलै रोजी स्व.मनिष कुलकर्णी स्वलिखित राज्यस्तरीय मराठी काव्यवाचन स्पर्धा होणार आहे. ही स्पर्धा सकाळी १० वाजेपासून सावेडीच्या रायसाहेब पटवर्धन सभागृहात येथे होणार आहे. यासाठी विमान वयोमर्यादा १५ वर्षे असून, या स्पर्धे साठी प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे रुपये ५०००, ३०००, २००० रोख, प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह व पाच उत्तेजनार्थ अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

कथाकथन व काव्यवाचन या दोन्ही स्पर्धांच्या प्रवेशिका पाईपलाईन रोड येथील अमृतेश्वर किराणा स्टोअर व यज्ञ मेडिकल, होशिंग हॉस्पिटलसमोर येथे उपलब्ध आहेत. माहितीसाठी दुरध्वनी क्रमांक ९८२२२०८६४८, ९८२३३८५१९६ येथे संपर्क साधावा.

बारा इमाम कोठळा येथे मोहरमनिमित्त पंजाची स्थापना करण्यात आली. यावेळी कोठला शहर विभागाचे उपअधीक्षक अमोल भारती व तोफखाना पोलीस स्टेशनचे पीआय आनंद कोकरे यांचा ट्रस्टच्या वतीने विश्वस्त दस्तगीर बडेसाहब जहागिरदार यांनी सत्कार केला. (छाया – बबलू शेख)

मोहरम मिरवणुकीत प्रशासनाने सर्व सोयी-सुविधा पुरवाव्यात

बारा इमाम कोठला मोहरम उत्सव समितीच्यावतीने जिल्हा पोलिस अधिक्षकांना निवेदन

नगर – मोहरम उत्सवाहात प्रशासनाने सहकार्य करुन सर्वोतोपरि सोयी–सोयी उपलब्ध करुन द्यावे, अशा आशयाचे निवेदन बारा इमाम कोठला मोहरम उत्सव समितीच्यावतीने जिल्हा पोलिस अधिक्षक रावेश ओला यांना देण्यात आले. याप्रसंगी हाजी करीम हुंडेकरी, सय्यद खलील अब्दुल करीम, आय.बी.शाह, फारुक रंगरेज, सलीमतात्या रेडियमवाले, सय्यद साजिद आरिफ जहागिदार, सय्यद दस्तगीर बडेसाहेब जहागीरदार, अल्लमह जरियाला आदिंनह समाज बांधव उपस्थित होते.

मोहरम उत्सवाहात प्रशासनाने सहकार्य करुन सर्व सोयी–सोयी उपलब्ध करुन द्याव्यात असा आशयाचे निवेदन बारा इमाम कोठला मोहरम उत्सव समितीच्यावतीने जिल्हा पोलिस अधिक्षक रावेश ओला यांना देण्यात आले. याप्रसंगी हाजी करीम हुंडेकरी, सय्यद खलील अब्दुल करीम, आय.बी.शाह, फारुक रंगरेज, सलीमतात्या रेडियमवाले, सय्यद साजिद आरिफ जहागिदार, सय्यद दस्तगीर बडेसाहेब जहागीरदार, अल्लमह जरियाला आदि.

निवेदनात म्हटले आहे की, सालाबादप्रमाणे मोहरम उत्सव सर्व अहमदनगर शहरवासीयांसह देशभर मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. हा उत्सव साजरा करतांना इतर धर्मिसांची मुस्लीम होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. इस्लाम धर्माचा अर्थच प्रेम बंधूभाव, शांतता आहे. हा उत्सवातून दाखविण्याची संधी आहे.

नगर शहरातील मोहरम उत्सव हा सर्व जाती–धर्माचा उत्सव आहे. भारतात हिंदू–मुस्लिम एकतेचे प्रतिक म्हणून याकडे पाहिले जाते. शहरातील बारा इमाम कोठला येथे इमाम हुसेनची सवारी आहे (डोला). या ठिकाणी सर्व जाती धर्माचे लोक उत्सव साजरा करत असतात. त्या अनुशंगाने सर्व प्रशासनाचे नेहमीच सहकार्य असते ते यंदाही राहील.

सालाबादप्रमाणे रात्री १२ वाजेपर्यंत पारंपारिक वाद्य वाजविण्याची परवानगी असते. सवारीवर भाविकांना फुले वाहण्यासाठी व सवारी बरोबर चालणाऱ्या टेबिवर तेल टाकण्याची सर्वधर्मियांची श्रद्धा आहे. भाविक रात्रभर सवारीबरोबर असतात, ही पाचशे वर्षांची परंपरा आहे. तसेच शहरातील विविध भागातील यंग पाटर्यांना चादर मिरवणुकीला काय्याच्या चौकटीत विनाअट परवानगी देणे, कत्तलच्या रात्री वाद्यांना रात्री बारा वाजेपर्यंत परवानगी देणे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना आदेश द्यावेत.

सवारी मिरवणुक मार्गावरील खड्डे बुजवून पॉचिंग करण्यात यावे. मिरवणुक मार्गावर वीज वितरण कंपनीने स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी, मार्गावर सीसीटीव्ही लावण्यात यावेत, मिरवणुकीबरोबर सर्व सोयीयुक्त अॅम्बुलन्स असावी, तसेच दोन मोबाईल शौचालयाची व्यवस्था व्हावी, बारा इमाम कोठला येथे सालाबादप्रमाणे जनरेटर, हेलोजन लाईटची व्यवस्था करण्यात यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

मोहरमच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून बारा इमाम कोठला परिसराची पाहणी

नगर – बारा इमाम कोठला येथे मोहरमनिमित्त पंजाची स्थापना करण्यात आली. यावेळी कोठला परिसराची मोहरमच्या पार्श्वभूमीवर शहर विभागाचे उपअधीक्षक अमोल भारती व तोफखाना पोलीस स्टेशनचे पीआय आनंद कोकरे यांनी दर्शन घेऊन पाहणी केली. यावेळी ट्रस्टच्या वतीने श्री. भारती व श्री. कोकरे यांचा विश्वस्त दस्तगीर बडेसाहब जहागिरदार यांनी सत्कार केला. यावेळी सय्यद खालील, आरिफ सय्यद, शकूर शेख, अजीज सय्यद, जुबेर हुंडेकरी, शहेबाज बॉक्सर, निसार बडेसाहब जहागिरदार, नजीर खान, मुजावर सय्यद रफा वाहेदअली, सय्यद फैजान रफा, सय्यद सादिक, निहाल सय्यद, वाहिद हुंडेकरी, साहेबान जहागिरदार, सादिक मेंबर, सय्यद संजीव, सय्यद जुबेर, अजीज जुबेर हुंडेकरी, सय्यद निसार बडेसाहब जहागिरदार, खान नजीर आदी उपस्थित होते.

ट्रस्टच्या मागणीनुसार कोठला परिसरात मोहरम सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर आ. संग्राम जगताप यांनी विविध विकासकामे मार्गी लावली आहेत. स्ट्रीट लाईट, रस्त्याचे डांबरीकरण केल्याने नागरिकांनी विशेष धन्यवाद दिले आहेत. मोहरम पूर्ण होईपर्यंत या भागात स्वच्छता अभियान सुरू राहणार असल्याचे स्थानिक नगरसेवक समद खान, सचिन जाधव, मुजाहिद कुरेशी, सादिक मेंबर, आरिफ मेंबर, साहेबान जहागिरदार, संजीव सय्यद यांनी सांगितले. महापालिकेचे मनपा अभियंता निंबाळकर व पारखे या कामावर देखरेख ठेवून आहेत. विश्वस्तांनी पोलीस अधिकाऱ्यांना परिसराची व मोहरमविषयी संपूर्ण माहिती दिली. मोहरमच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक बंदोबस्त द्यावा, अशी मागणी केली. टवाळखोर मुलांना आळा बसावा, यासाठी कसोशीने प्रयत्न करण्याची मागणी त्यांनी केली.

संस्कृतकडे स्कोरिंग विषय म्हणून पाहू नका

प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांचे विद्यार्थ्यांना आवाहन; सारडा महाविद्यालयात जागतिक संस्कृतदिन उत्साहात साजरा

नगर – संस्कृत ही सर्व भाषांची जननी असून ज्ञानभाषा आहे. त्यामुळे भारतीय प्रादेशिक भाषांसह ग्रीक व लॅटिन भाषांचे संस्कृतशी काही प्रमाणात साम्य आहे. महाकवी कालिदास यांनी संस्कृत भाषेतून केलेले साहित्य लेखन अजरामर झाले आहे. भारतासह अनेक देशातील अभ्यासकांना त्यांच्या संस्कृत साहित्याची भुरळ आहे. त्यामुळे महाकवी कालिदासांचे संस्कृत लेखन जगात विख्यात झाले आहे. अशा संस्कृत भाषेचा विद्यार्थ्यांनी गांभीर्याने अभ्यास करावा. स्कोरिंग विषय म्हणून संस्कृतकडे पाहू नका, सारडा महाविद्यालयात संस्कृत भाषा उत्तमप्रकारे शिकवली जात असून विद्यार्थ्यांसाठी विशेष वर्ग चालवले जात आहेत, असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या.

पेमराज सारडा महाविद्यालयात जागतिक संस्कृतदिन साजरा करताना बोलताना प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित. व्यासपीठावर वेदशास्त्र संपन्न विश्वेश्वर शास्त्री निसळ, उपप्राचार्या डॉ. मंगल भोसले, पर्यवेक्षक राजू रिक्कल आदी.

हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात महाकवी कालिदास यांचा जन्मदिवस व जागतिक संस्कृत दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संस्कृत विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे वेद शास्त्र संपन्न सिद्धेश्वरशास्त्री निसळ होते. संस्कृत पासून लांब नेले. त्यामुळे खूप समृद्ध असलेल्या संस्कृत भाषेला जवळ करत विद्यार्थ्यांनी या भाषेचे उत्तम ज्ञान घेण्यासाठी भरपूर अभ्यास करावा.

प्रास्ताविकात प्रा.भावना वैकर म्हणाल्या, सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यी मोठ्या आवडीने संस्कृत भाषेचे अध्ययन करत आहेत. या भाषेत उच्चारण शास्त्राला खूप महत्व असून संस्कृत शब्दांच्या उच्चारने वाणी शुद्ध होते. त्यामुळे उच्चारण शास्त्रावर भर देत येथे विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा शिकवली जात आहे.

यावेळी कु.रेणुका निसळ, अर्णव मुळे, सर्वेश कुलकर्णी व श्रुताविंदा चांसीकर आदी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रणाली देशपांडे हिने केले.

महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.मंगल भोसले, पर्यवेक्षक राजू रिक्कल, संस्कृत विभागाच्या प्रमुख प्रा.भावना वैकर, वेद निसळ आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे सिद्धेश्वर निसळ म्हणाले, पूर्वी भारतीय संस्कृतीमध्ये गुरुकुल पद्धतीने संस्कृत भाषेचे अध्ययन होत असे. त्यावेळी आपली भाषा समृद्ध होती. पण इंग्रजांनी गुरुकुल पद्धत मोडीत काढून आपल्याला नागरिकांसाठी करत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी पाचे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले व ग्रामीण भागात असलेल्या संसाधनाचा योग्य वापर केल्यास प्रगती होऊ शकते असे सांगितले. पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थांना वह्या पुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन रेश्मा शेख यांनी केले. आभार स्वाती वायकर यांनी मानले.

माणसाच्या मनाचीही नियमित देखभाल गरजेची

रविराज चित्याल यांचे प्रतिपादन

नगर – व्याप्रमाणे आपली वाहने सुरळीतपणे चालण्यासाठी त्यांची नियमित पणे देखभाल करतो त्याप्रमाणे आपल्या मनाचीही नियमितपणे निगा राखणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आर्ट ऑफ लिविंग चे स्वयंसेवक रविराज चित्याल यांनी केले.

श्री. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये शालेय साहित्य व गणवेश वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उद्योजक राजेंद्र पाचे, संस्थेचे सचिव प्रा विनय शिंदे, सुनिता तनपुरे ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

श्री. रविराज पुढे म्हणाले की आर्ट ऑफ लिविंग च्या माध्यमातून मानवाला त्याचे ध्येय साध्य करण्यासाठी मदत केली जाते. शालेय्या माध्यमातून या विद्यार्थांना भविष्यातील उत्तम नागरिक म्हणून घडवण्यासाठी आवश्यक ते सहकार्य केले जाईल.

शिंदे यांनी प्रास्ताविक केले यामध्ये शाळेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या व परिसरातील

श्री. शरद कोलते इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये शालेय साहित्य व गणवेश वाटप करताना आर्ट ऑफ लिव्हिंगचे स्वयंसेवक रविराज चित्याल. समवेत राजेंद्र पाचे, प्रा. विनय शिंदे, सुनिता तनपुरे आदी.

धम्माल मनोरंजन

शब्दरंजन

आडवे संकेत

१) इज्जत असलेला
३) क्षुद्र, हलकट
७) दौलत, संपत्ती
८) झाडाला लागते ते
९) साधना
११) दुर्दशा, अवकळा
१२) एक वजनी माप
१३) एक संख्या
१४) उलणे, भेग
१५) राहू, राष्ट्रप्रेम
१७) लढाई, मारामारी
१९) मुलगी, पुत्री
२०) सुप्रास अन्न बनविण्याचे कौशल्य
२३) गाईचे पिल्लू
२५) सुटीचा दिवस
२७) लालसरपणा
२८) उपस्थित
३०) नमुनेदार
३३) योग्य, रास्त
३५) जाडी व रुंदी असलेली वस्तू ३६) आश्रय
३८) गलाण्या आजुबाजूचा भाग
३९) करपलेला भाग
४०) आकाश, रव
४१) गाभा, मगज
४३) टीपारांह
४५) राजाची पत्नी
४६) तीव्र इच्छा
४८) एक बेट
५०) आदत५१) जाड कणिक
५२) पायी चालत असलेला प्रवासी

उभे संकेत

१) समाप्त दर्शक अध्याय
२) श्रीकृष्ण
३) गरीब, पामर
४) एक अंत्यसंस्कार
५) घाण, विष्ठा
६) एक पक्षी
१०) एकावर सतरा शुन्य एवढी संख्या
११) वेगळा
१२) हृदय, इच्छा
१३) प्रतिबंध, कैद
१४) पुष्कळ, फार
१५) एक इंग्रजी संख्या
१६) सज्ज, लठ्ठ
१८) हत्ती, घोडे, नोकर–चाकर इ.
१९) झाड, वृक्ष
२०) अलगुज
२१) जादूटोण्याचा एक प्रकार
२२) सायमन परत जा म्हणणारे
२४) कमी–अधिक
२६) खाण्याचे पान
२९) नवीन युगाची वाणी
३१) एका जातीचे नाव
३२) पत्नी ३३) एक शेंगभाजी
३४) मिंत बांधणीची एक वस्तू
३७) वधुवरांच्या मधे धरावयाचा कपड
३८) जाय कॉग्रेसचे एक बोधचिन्ह
४२) आवड, रुची
४४) बाजू, कडा ४७) स्त्री
४९) दीपक

को	शा	गा	र		मि	श	स	दा	र		श	के		
का	ही	ल		र	स	व	ट		ग	ड		स		
को	र	फ	ड			स	प	शे	ल		वै	षे		
ला		ट	र	बु	ज		ट	व		भ	र			
	पा		का	क	प	द		चि		र	ण			
क	र	ग	ळी				अ	व	चि	त		आ		
म	ग	र		ग	ऊ	ळ	वा	डा		भे	व	जी		
ता	ल		मा	ज			ज		घ	ट		व		
क		मु	र	मु	रा		बी	ज				न		
द	बे	ल		ख		बे		न	व	जा	त			
	षे	त्ता			स	र	जा	म		ज	र	द		
र	ज	ई		रो		ग	म	त	र	म	त			
जा			सं	ग	म		गी		द्व		री	त		

सुविचार

जसे प्रकाशाच्या सहाय्याशिवाय वस्तू दिसत नाही, तसे विचाराशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही.

दिनविशेष १२ जुलै २०२४

१००० ई.पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८७७: हेन्री थोरो – अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
ख्रिस्त पूर्व १०० : ज्यूलियस सीझर – रोमन सम्राट (मृत्यू: ? ? ख्रिस्त पूर्व ४२)
१८५२: अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो ब्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४: जॉर्ज इस्टमन – अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३: वि. का. राजवाडे – इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४: जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर – अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९: बिमल रॉय – प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३: इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२०: शशवंत विष्णू चंद्रचूड – सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७: भारतीय क्रिकेट खेळाडू पृथिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१: भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५: संजय मांजरेकर – भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२: अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७: युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला युसुफजई यांचा जन्मदिन.
१४८९: दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६०: बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१८९२: अलेक्झांडर कार्टराईट – बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१०: पॉल्स–रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस् यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९: आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४: हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वर्सात साडे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म: ? ? ????)
१९९९: राजेंद्रकुमार – हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२०००: मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१: देवांग मेहता – तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२: दारा सिंग – मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३: प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' – चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)

आजचे चिंतन

२०१३: बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १९२९)

१.दहीवडे, बटाटेवडे इ. कुठल्याही प्रकारचे वडे करताना पिठात सोडा घालण्याऐवजी तेल तापल्यावर त्यात किंचित सोडा घालावा.
२.डोशासाठी भिजवलेले तांदूळ व उडीद डाळ मिक्सरमधून काढावेत. त्याचबरोबर जाडे पोहे भिजवून तेही मिक्सरमधून काढावेत. डोशाचा रंग सुरेख होतो.
३. इडली किंवा ढोकळा हलका होण्यासाठी त्याचे पीठ भिजवताना त्यात चिमूटभर तुरटीची पूड टाकावी. इडली अगर ढोकळा खूप हलके व स्पंजी होतात.
४. बटाट्याचे परोठे बनविताना बटाट्यात लोणच्याचा थोडा उरलेला मसाला घालावा. परोठे खूपच स्वादिष्ट होतात.
५. केक्समध्ये घालायचे मिल्कमेड घरात नसल्यास ज्या प्रमाणात पाहिजे त्या प्रमाणात दूध घ्यावे व खव्याच्या आधीच्या अवस्थेपर्यंत ते उकळावे व केकमध्ये जेवढी साखर सांगितली असेल त्यापेक्षा दोन चमचे जास्त साखर घालावी.

कविता

रताळ्याच्या पोळ्या

साहित्य: १ वाटी उकडलेल्या रताळ्याचा लगदा, (स्मॅश करून) १/२ वाटी गूळ, १/४ वाटी मिल्क पावडर, १ वाटी कणीक, वेलची पावडर, मीठ, तेल.

कृती: कढईत रताळ्याचा मऊ गोळा, त्यात किसलेला गूळ घेऊन गरम करावा. गूळ विरघळवून गोळा झाला की त्यात मिल्क पावडर व वेलची पावडर घालावी. आणि गॅस बंद करून रताळ्याचं सारण एकजीव करावं. कणीक तेल आणि मीठ घालून सैलसर मळून घ्यावी. छोटे छोटे गोळे करून त्यात रताळ्याचं सारण भरून पोळ्या लाटाव्यात. बाजूला साजूक तूप सोडून खरपूस भाजावं.

टीप: हया पोळ्या ४/५ दिवस टिकतात. रताळं हे शक्तीवर्धक व पौष्टिक असल्यामुळे मुलांना डब्यात खाऊ म्हणून पोटभरीचं आहे.



१) कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जन्मगाव खालीलपैकी कोणते?
अ)कुंभोज ब)पुणे क)सातारा ड) कोल्हापूर
२) खालीलपैकी कोणत्या भारतीय विचारवंताचा मृत्यू ब्रिस्टॉल (इंग्लंड) येथे झाला?
अ)दयानंद सरस्वती ब)मौलाद चिराग अली
क)स्वामी विवेकानंद ड)राजाराम मोहन रॉय
३) खालीलपैकी कोण राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनात उपस्थित नव्हते?
अ)लोकमान्य टिळक ब)गो.ग. आगरकर
क)महात्मा गांधी ड)रा.गो. भांडारकर
४) राष्ट्रसभेचे पहिले अधिवेशन खालीलपैकी कोठे भरले होते?
अ)अहमदाबाद ब)मुंबई क)दिल्ली ड)कलकत्ता
५) राष्ट्रसभेच्या १९१६ मधील अधिवेशनात जहाल व मवाळ यांच्यात तडजोड झाली ते अधिवेशन कोठे भरले होते?
अ)अहमदाबाद ब)मुंबई क)दिल्ली ड)लखनौ
६) खालीलपैकी कोणत्या सालच्या सुधारणा कायद्यान्वये मुस्लीमांप्रमाणे शिखनांही स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले होते?
अ)१९१९ ब)१९३२ क)१९४२ ड)१९४८
७) भारतात स्त्रियांच्या उद्धारासाठी खालीलपैकी कोणत्या महापुरुषाने आपले उभे आयुष्य खर्ची घालले?
अ)विनोबा भावे ब)राजर्षी शाहू महाराज
क)महर्षी धोंडो केशव कर्वे ड)कर्मवीर भाऊराव पाटील
८) इंग्लंडमधील कु. मार्गारेट नोबेल या विवेकानंदांच्या शिष्या बनल्या. त्या पुढेकोणत्या नावाने प्रसिद्धीस आल्या?
अ)मॉ आनंद शीला ब)भगिनी निवेदिता
क)मदर मार्गारेट ड)माताजी
९) खालीलपैकी कोणास अर्थशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते?
अ)वि.दा. सावरकर ब)दादाभाई नौरोजी
क)नारायणराव लोखंडे ड)महर्षी वि.रा. शिंदे
१०) खालीलपैकी कोणाच्या मते १८५७ चा उठाव म्हणजे भारतीयांचे पहिले स्वातंत्र्य युद्ध होते?
अ)रिया सतकार सरदेसाई ब)रविंद्रनाथ टागोर
क)राजाराम मोहन राय ड)वि.दा. सावरकर
११) संगनकामधील फ्लॉपी डिस्क म्हणजे खालीलपैकी काय होय?
अ)माहिती साठविण्याचे एक साधन
ब)माहिती पाठविण्याचे एक साधन
क)माहिती एकत्र करण्याचे साधन ड) सॉफ्टवेअर
१२) सिस्मोमीटरचा उपयोग कशासाठी केला जातो?
अ)दुरध्वा वस्तूंसाठी ब)मुक्यांचे केंद्र व तिव्रतेसाठी
क)द्रवांची घनता व प्रसारणासाठी ड) यांत्रिक कंपन्यांसाठी
१३) काही विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट क्षेत्रातील काही व्यक्तीमध्येच उद्दमवनाऱ्या आजारास काय म्हणतात?
अ)कॉन्टेजिअस ब)एपीडेमिक क)एंडेमिक ड)वायरस
१४) हर्टझ हे कशाच्या मापणाचे एकक आहे?
अ)प्रवर्तन ब)गती क)वारंवारता ड)तरंगलांबी
१५) खालीलपैकी बी कॉम्प्लेक्स या जीवनसत्वाचा घट नसलेला पदार्थ कोणता?
अ)थायामिन ब)राइबोफ्लाविन
क)फॉलिक ॲसिड ड)ॲस्कॉर्बिक ॲसिड
१६) डिझेलवर चालणाऱ्या इंजिनामध्ये कशाचे इग्निशन (ज्वलन) होते? अ)घर्षणामुळे ब)स्वयंचलित स्टार्टरमुळे
क)स्पार्क प्लगमुळे ड) कॉम्प्रेशनमुळे
१७) स्प्रिंग तराजूचे कार्य कोणत्या तत्त्वावर चालते?
अ)बॉईलचा नियम ब)हूकचा नियम
क)बर्नोलीचे नियम ड)पास्कलचा नियम
१८) ग्रीनीच वेळ ही भारताच्या प्रमाणित वेळेपेक्षा किती मागे आहे?
अ)दोन तास १० मिनिटे ब)१ तास १५ मि.
क)५ तास ३ मि. ड) १ तास ५२ मि.
१९) भारतातील कोणत्या कामगार नेत्याच्या सन्मानार्थ मे २००५ मध्ये टपाल तिकिट प्रकाशित करण्यात आले?
अ)नारायण मेघाजी लोखंडे ब)बॅ. हरिश्चंद्र आ. तालचेलकर
क)सिताराम केशव भोले ड)भिवाजी रामजी नरे
२०) २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सरकारची स्थापना कोठे केली?
अ)बर्लीन ब)सिंगापूर क)टोकियो ड)सुमात्रा

उत्तर: (१–अ), (२–ड), (३–क), (४–ब), (५–ड), (६–अ), (७–क), (८–क), (९–ब), (१०–ड),(११–अ), (१२–ब), (१३–क), (१४–ब), (१५–ड), (१६–ड), (१७–ब), (१८–क), (१९–अ), (२०–ब),

फिल्मीरंजन

आडवे संकेत

१) घुम्मा घुम्मा दे दे घुम्मा घुम्मा दे दे घुम्मा.... यह गाना इस गायक ने गाया है.
४) सन् १९९३ में बनी आशिक आवारा का नायक.
६) सन् २००० में बनी इस फिल्म में आमिर खान और ट्विंकल खन्ना थे. ७) सन् १९६३ में बनी ब्लफमास्टर का नायक.
८) खिले (फिल्म)
१) सन् १९९८ में संगीत सिवन के निर्देशन में बनी इस फिल्म में सनी देओल और सुष्मिता सेन थे. ११) सन् १९९४ में बनी फिल्म इम्तीहान की नायीका. (सिर्फ नाम) १३) इस फिल्म में संजय दत्त, सलमान खान और माधूरी दीक्षीत थे. १५) एक संघर्ष (फिल्म)
१६) निरपा (सहनायीका) १७) रामपाल (नायक)
१८) सन् १९७२ में बनी इस फिल्म में हेमा मालिनी का डबल रोल था. २०) झिनत (नायीका) २२) सन् १९९८ में बनी प्रेम अगन के निर्देशक.
२४) सन् १९८८ में निर्देशक गुलजार की इस फिल्म में नसिरुद्दीन शाह, रेखा और अनुराधा पटेल थे. २८) सन् १९७६ में निर्मात्ता निर्देशक रामानंद सागर की इस फिल्म में धर्मेंद्र, हेमा मालिनी, अमजद खान और अजीत थे.
२९) सन् १९८८ में बनी फिल्म खुन भरी मांग का खलनायक.
३१) सन् १९९९ में बनी इस फिल्म में रेखा, जितेंद्र, रणधीर कपूर और राकेश रोशन थे.
३३) अग्निहोत्री (नायीका)
३४) कस्सम (फिल्म)
३५) सन् १९९३ में प्रियदर्शन के निर्देशन में बनी इस फिल्म में जैली श्रॉफ, डिम्पल कपाडिया और मुकेश ऋषी थे.

उभे संकेत

१) विवेक ओबेरॉय के अभिनेता पिता. २) सन् १९९४ में बनी फिल्म राजा बाबू में गोविंदा का दोस्त. ३) मेरे हम (फिल्म)
४) सन् १९९० में निर्देशक दिपक बलराज विज की इस फिल्म में आदित्य पांचोली और माधूरी दीक्षीत थे. ५) अमर अन्थोनी (फिल्म) ६) सन् १९९८ में टिनू आनंद निर्देशित इस फिल्म में अमिताभ बचन, अजय देवगन और सोनाली बेंद्रे थे. १०) तुम (फिल्म)
१२) सन् १९९२ में बनी फिल्म द्रोही का नायक. १४) शिल्पा शिरोडकर की नायीका बहन. १५) सन् १९९२ में फिरोग सिद्दीकी निर्देशित इस फिल्म में अजय देवगन, करिश्मा कपूर और अजीत थे. १७) सन् १९९४ में बनी इस फिल्म में संजय दत्त, हिरा रामगोपाल, अक्षय कुमार और कंचन थे. १९) सन् १९९९ में निर्माता निर्देशक सुभाष घई की इस फिल्म में अक्षय खन्ना, ऐश्वर्या रॉय और अनिल कपूर थे.
२१) प्रेम रोग (फिल्म)
२३) आपकी (फिल्म)
२५) निलम अभिनीत पहली मिल्म.
२६) तुझे मेरी (फिल्म)
२७) मोनिका (नायीका)
२८) चल्ते (फिल्म)
३०) सन् १९९३ में कृष्णकांत पंछ्या निर्देशित इस फिल्म में अजय देवगन और उर्मिला थे.
३२) इनाम हजार (फिल्म)

आ	अ	ब	ली	ट	च	ले		का	द	र	खा	न		
फ		ल			ल		ह	म				ही		
ता		वा	दे		मे	ला		चो	री	चो	री			
ब	द	न			रे			र		र				
शि			दि	व्या	भा	र	ती				औ	जा	र	
ब	जू	द			ई				ई	श्व	र		ज	
दा		म		शो		क	ह	ना		चा	द	नी		
सा	ज	न	च	ले		शै		म		द		कां		
नी						ना		द	म		अं	त		
			अ	चा	न	क		स			त			
अ			मा			पू		ह		श	रा	बी		
ध	ड	क	न		शो	र		जा	दु		मा			
र्म			त	क			औ	र		जा	ली	म		

नगरमध्ये खंडणीसाठी डॉक्टरचे अपहरण, धमकावण्यासाठी केला गोळीबार

नंतर आपल्यावरच गोळीबार झाल्याचा केला बनाव; आरोपीचा कारनामा पोलिसांनी केला उघड

नगर – नगर शहरातील एका प्रतिष्ठित डॉक्टरला ब्लॅकमेल करुन पैसे उकळण्याच्या उद्देशाने डॉक्टर आणि त्यांच्या हॉस्पिटल मध्ये काम करणारा कामगार यांचे अपहरण केले. त्यांना घाबरविण्यासाठी बंदुकीतून गोळीबार केला अन् नंतर आपल्यावरच गोळीबार झाल्याचा बनाव केल्याचा प्रकार बुधवारी (दि.१०) सायंकाळी माळीवाडा ते मार्केटयार्ड चौक रस्त्यावर एका दुकानात घडला. मात्र पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत सखोल तपास करून हा बनाव उघडकीस आणला असून तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

सिराज दौलत खान, त्याचा मुलगा मोईन खान व निसार (पूर्ण नाव माहित नाही) अशा तिघांवर हा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत राजेंद्र देविदास बहुघने (वय ३३, रा. छत्रपती संभाजी नगर) यांने फिर्यादि दिली आहे. फिर्यादी बहुघने हा पूर्वी तारकपूर येथील डॉ. प्रदीप तुपेरे यांच्या नवोदय हॉस्पिटलमध्ये कामाला होता. आरोपी सिराज खान आणि फिर्यादी राजेंद्र बहुघने यांच्यावर काही वर्षांपूर्वी डॉ. प्रदीप तुपेरे यांच्या हॉस्पिटलबाहेर असलेल्या अतिक्रमण काढण्यावरुन सरकारी कामात अडथळा झाल्याचा गुन्हा दाखल झाला होता. हा गुन्हा डॉक्टरांमुळेच आपल्यावर दाखल झाला असल्याचे म्हणत आरोपी सिराज खान हा डॉ. तुपेरे यांना ब्लॅकमेल करुन पैसे उकळत होता.

आता पुन्हा डॉक्टरला भीती दाखवून डॉक्टरांकडून अजून पैसे उकळण्याचा डाव सिराज खान याने आखला. त्याने फिर्यादी बहुघने याला बुधवारी (दि.१०) सायंकाळी ५ च्या सुमारास तारकपूर

गोळीबार झालेल्या घटनास्थळी भेट देवून पाहणी करताना पोलिस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, कोतवाली पोनि. प्रताप दराडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. दिनेश आहेर व पथक. (छाया – बबलू शेख)

बसस्थानकातून बळजबरीने त्याच्या इनोव्हा कारमध्ये बसवून डॉ. तुपेरे यांच्या नवोदय हॉस्पिटलमध्ये नेले तेथून डॉ.तुपेरे यांना घेवून दोघांना माळीवाडा ते मार्केटयार्ड चौक रस्त्यावर त्याच्या स्वतःच्या मालकीच्या मस्तिर फिस अॅन्ड बर्ड हाऊस येथे घेऊन गेला. त्या ठिकाणी बहुघने यास मारहाण करुन सिराज खान याने बहुघने याच्यावर गोळी झाडण्याचे नाटक करत ही गोळी जमिनीवर फायर केली. तीच बंदूक राजेंद्र बहुघने यांच्या हातात देऊन त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या डॉ. प्रदीप तुपेरे यांना दम देऊन सांगितले की, पोलिस आल्यावर सांगायचे की राजेंद्र बहुघने यानेच माझ्यावर गोळीबार करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. गोळीबाराचा आरोप हा डॉक्टरांकडेच पूर्वी काम करणाऱ्या बहुघने याच्यावर जाईल आणि या सर्व प्रकारामुळे डॉक्टर घाबरुन आपल्याला पैसे देतील असं सिराज खान याला वाटले.

मात्र, ही घटना घडल्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी सर्वांना ताब्यात घेऊन पोलीस ठाणे गाठले. पोलीस ठाण्यात आल्यानंतर डॉ. प्रदीप तुपेरे यांनी सिराज खानने सांगितल्यानुसार पोलिसांनी जबाब देण्यास सुरुवात केली होती. मात्र, डॉ. प्रदीप तुपेरे जबाब देत असताना अनेक वेळा अडखळले आणि त्याच ठिकाणी पोलिसांनं संशय बाळगला. पोलिसांनी घटनास्थळी असलेल्या सर्व संशीयतांची वेगवेगळ्या खोलीत घेऊन विचारपूस केली असता हा सर्व बनाव असून डॉ. प्रदीप आणि राजेंद्र बहुघने यांनी भीतीपोटी सर्व प्रकरण आपल्या अंगावर घेण्याचा प्रयत्न केला होता हे समोर आले.

दरम्यान, मुख्य आरोपी हा सिराज खान हाच असून त्याने डॉक्टर तुपेरे आणि बहुघने यांना धमकी देऊन पोलिसांनसोर वेगळा जबाब द्यायला सांगितल्याचे समोर आले आहे. त्यामुळे रात्री उशिरा याप्रकरणी राजेंद्र बहुघने याच्या फिर्यादीनुसार सिराज खान, मोईन खान, निसार यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १४० (१), १०९ (१), ६१ (२)(अ), ३०८ (२) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वादग्रस्त ठरलेल्या यशवंत डांगे यांना मनपा आयुक्तपदी बसवण्यासाठी लोकप्रतिनिधीची राजकीय ताकद पणाला

मनपा लुटून खाण्याचा काहींचा डाव, डांगेंची नियुक्ती तात्काळ रद्द करा

नगर – मनपाला भ्रष्टाचाराची कीड लागलेली आहे. फरार आयुक्त पंकज जावळे आणि त्यांचा पीए देशपांडे हे अँटी करप्शनच्या ट्रॅपमध्ये सापडल्यामुळे त्यांच्यावर कारवाई सुरू आहे. ज्या राजकीय नेतृत्वाने त्यांच्या नियुक्तीची शिफारस केली होती त्यांचा या भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी आटापिटा सुरू आहे. या जागी मनपा प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या देविदास पवार यांची नियुक्ती राज्य सरकारने केली होती. मात्र भ्रष्टाचाऱांना वाचवू पाहणाऱ्या नेतृत्वाला पवार यांच्या ऐवजी नगर मनपामध्ये यापूर्वी उपायुक्त म्हणून अत्यंत वादग्रस्त ठरलेल्या यशवंत डांगे यांना आयुक्तपदी बसवण्यासाठी आपली राजकीय ताकद पणाला लावण्याची दुर्बुद्धी झाली. मनपा लुटून खाण्याचा काहींचा डाव आहे. हे शहराच्या दृष्टीने अत्यंत दुर्भाग्यशाली आहे. राज्य सरकारने डांगे यांच्या नियुक्तीचा फेरविचार करत तात्काळ रद्द करावी अशी मागणी शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

किरण काळे

यापूर्वीच्या आयुक्तांच्या नियुक्तीसाठी शहराच्या स्थानिक आमदारांनी शिफारस केली होती. भ्रष्टाचारी असणाऱ्या अत्यंत अयोग्य व्यक्तीची शिफारस करण्यात आली. त्यामुळे संगनमतातून सर्वसामान्य नागरकांना लुटले गेले. वेठीस धरले गेले. धाडस करत संबंधित तक्रारदाराने त्यांच्या विरोधात अँटी करप्शनच्या माध्यमातून ट्रॅप लावला. जर ते दोषी नव्हते तर अद्याप फरार का आहेत? त्यांना वाचविण्यासाठी राजकीय नेतृत्वाकडून जीवाचा अकांड तांडव का केला जात आहे? हे नागरकांना माहित आहे.

पुढे म्हटले आहे की, या भ्रष्टाचाराबद्दल सर्वसामान्य नगरकांमध्ये सर्वच स्तरात तीव्र संतापाची भावना आहे. असे असताना प्रशासकीय कामकाजाचा तब्बल २० ते २२ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या देविदास पवार यांची नियुक्ती अवघा दोनच दिवसात तातडीने रद्द करून अति जलद गतीने सर्व प्रशासकीय प्रक्रियांच्या पूर्ततेचा फार्स करून यापूर्वी मनपात उपायुक्त पदावर काम केलेल्या यशवंत डांगे यांच्यासारख्या वादग्रस्त अधिकाऱ्याची नियुक्ती राज्य सरकारने करणे हे अत्यंत धक्कादायक आहे. यासाठी ज्या राजकीय नेतृत्वाने यापूर्वीच्या आयुक्तांच्या नियुक्तीसाठी कौतुकाचे हमले चढवत लेखी शिफारस केली होती त्यांनीच आता डांगे यांच्या नियुक्तीसाठी देखील आपले राजकीय वजन पणाला लावले होते. या नियुक्तीचा मास्टरमाईंड कोण आहे हे नगरकरांना माहित आहे. यापूर्वीच्या आयुक्तांकडून भ्रष्टाचारची अर्धवट राहिलेली कामे नवीन आयुक्तांच्या माध्यमातून करून घ्यायची आहेत की काय? म्हणूनच या नव्या नियुक्तीचा अट्टाहास केला आहे की काय? असा सवाल किरण काळे यांनी केला आहे.

डांगे यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी करा

यशवंत डांगे यांनी यापूर्वी नगर मनपामध्ये उपायुक्त पदावर काही काळ काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी ज्या ज्या फाईलींवर सह्या केल्या आहेत, त्या कामाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत त्या सर्व कामांची सखोल चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत करण्यात यावी. त्यातून डांगे यांच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचाराचे धागेदोरे उघड होतील. त्यासाठी मंत्रालय स्तरावरुन तातडीने चौकशी समिती गठीत करण्यात यावी अशी मागणी, किरण काळे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली आहे.

मनपात झिरो करप्शन हवे, नियुक्तीचा निषेध

यापूर्वी वादग्रस्त ठरलेल्या यशवंत डांगे यांच्या नियुक्तीचा आम्ही शहर जिल्हा काँग्रेसच्या वतीने तसेच नगरकरांच्या वतीने तीव्र निषेध करीत आहोत. नागरकांना मनपामध्ये झिरो करप्शन (शून्य भ्रष्टाचार) हव आहे. भ्रष्टाचार मुक्त प्रशासन देण्यासाठी काँग्रेस तीव्र स्वरूपाचा लढा उभा करेल, असा इशारा काळे यांनी दिला आहे.

आपली पाप झाकण्यासाठी आशा नियुक्त्या

यापूर्वीच्या आयुक्तांकडून संगनमत करत केलेल्या भ्रष्टाचाराची आपली पाप उघड होऊ नयेत यासाठी आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांचा सत्तेतील स्थानिक राजकीय नेतृत्वाकडून आणले गेले आहे. जेणेकरून यापूर्वी केलेली भ्रष्टाचारची कृत्ये झाकता येतील. त्यासाठी काहीजण आटापिटा करीत आहेत. ज्यावेळी पापाचा घडा भरतो आणि ओसंडून वाहतो त्यावेळी मायबाप जनता जनार्दन भ्रष्टाचारी अधिकारी आणि राजकीय नेतृत्वाने त्यांची जागा दाखवून देते, हे अशा नियुक्तीसाठी पाठबळ देणाऱांनी लक्षात ठेवावे, असे किरण काळे यांनी म्हटले आहे.

अहमदनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक पदाचा पदभार यशवंत डांगे यांनी स्वीकारला. यावेळी नांगरे बुधेच्या तसेच मनपाचे अधिकारी अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी, उपायुक्त विजयकुमार मुंढे, मेहेर लहारे आदी. (छाया – लहू दळवी)

नगरकरांमध्ये महापालिकेबद्दल आपलेपणाची भावना वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करणार

आयुक्त तथा प्रशासक पदाचा यशवंत डांगे यांनी स्विकारला पदभार

नगर – अहमदनगर महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर अधिकारी व प्रभाग अधिकारी यांची संयुक्त बैठक घेतली अपूर्व सुरु असलेल्या विकास कामांना गती देण्याच्या सूचना यावेळी दिल्या आहेत. मनपा प्रशासनाला गतिमान करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जाईल, याचबरोबर नगरकरांच्यादे महापालिकेबद्दल आपलेपणाची भावना वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न केले जातील, याचबरोबर दैनंदिन प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडवले जातील, स्वच्छ, सुंदर हरित नगर हरर बनविण्यासाठी काम केले जाईल असे अहमदनगर मनपा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

अहमदनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक पदाचा पदभार यशवंत डांगे यांनी स्वीकारला यावेळी आयुक्त यांच्या अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी, उपायुक्त विजयकुमार मुंढे, सहायक आयुक्त सपना वसावा, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, मुख्य लेखापरीक्षक विशाल पवार, जल अभियंता परिमल निकम, आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरो, शहर अभियंता मनोज पारखे, प्रसिद्धी अधिकारी शशिकांत नजान, अग्निशमन विभाग प्रमुख शंकर मिसाळ, अभियंता गणेश गाडळकर, प्रभाग अधिकारी अशोक साबळे आदी उपस्थित होते.

आदेश मुथा सी.ए.फायनल परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्युट ऑफ चार्टंड अकाउंटंटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) च्यावतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेली सी.ए.फायनल परीक्षा येथील आदेश मुथा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. त्याची आर्टिकलशिप पुणे येथील शहा, खंडेलवाल, जैन अॅण्ड असोसिएटस या सी.ए.फर्ममध्ये चालू आहे.

आदेश मुथा हा अहमदनगर मर्चंटस बँकेचे माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक आणि सी.ए.असोसिएशन नगर शाखेचे माजी अध्यक्ष सी.ए.,आयषी अजय मुथा यांचा मुलगा असून नगरमधील कर सल्लागार अमृतलाल मुथा व उद्योजक शरद गुंदेचा यांचा नातू आहे. मधुमेह तज्ज्ञ दिवंगत डॉ.अमय मुथा तसेच टॅक्स कन्सलंटंट आशिष मुथा यांचा तो पुतण्या आहे.

आदेशचे इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण नगरला भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये झाले. अभ्यासाबरोबरच खेळातही त्याने चांगले नैपुण्य प्राप्त केले. लहानपणापासून सी.ए.होण्याची त्याची इच्छा असल्याने बारावीनंतर त्याने पुणे येथे शिक्षण घेतले.

त्याला पुणे येथील सी.ए.निलेश खंडेलवाल, सी.ए.आशिष खंडेलवाल तसेच आजोबा टॅक्स कन्सलंटंट अमृतलाल मुथा, वडील सी.ए.,आयषी अजय मुथा व काका आशिष मुथा यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. स्वतःची उपजत बुध्दीमत्ता, घरातील सर्वांकडून मिळालेले प्रोत्साहन व पाठबळ यामुळे आदेशने मोठे यश संपादीत करुन परिवाराच्या नावलौकिकात भर टाकली आहे.

अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील विळद बायपास ते पुणतांबा फाटापर्यंतची अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने

जिल्हा पोलीस अधीक्षकांचे आदेश जारी

नगर – पत्रकार चौक ते एसपीओ चौकादरम्यान रोडचे काँक्रीटीकरण, शिंगणापुर फाटा ते राहुरी दरम्यान रोड दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. या मार्गावरुन अवजड वाहतुक मोठ्या प्रमाणात होत असते. या अवजड वाहनांचा दिंडीतील भाविकांना धक्का लागुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दिंडीमधील वारकऱ्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करत अहमदनगर-मनमाड या महामार्गावरील विळद बायपास ते पुणतांबा फाटापर्यंतची अवजड वाहतुक २१ जुलै पर्यंत पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश पारित केले आहेत.

अहमदनगरकडून मनमाडकडे जाणारी जड वाहतुक विळद बायपास-शेंडी बायपास-नेवासा-कायगाव-गंगापुर-वैजापुर-येवलामार्ग- मनमाडकडे किंवा केडगाव बायपास-कल्याण बायपास-आळेफाटा-संगमनेरमार्ग नाशिककडे जाईल.

शनिशिंगणापुर-सोनई वरुन राहुरीमार्गे मनमाडकडे जाणारी जड वाहने अहमदनगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरुन इच्छित स्थळी जातील.

देहरे-राहुरी कृषी विद्यापीठ, राहुरीकडून मनमाडकडे जाणारे जड वाहने श्रीरामपुर-बाभळेश्वर-निर्मळ पिंपरी बायपासमार्ग कोपरगाव-येवला-मनमाडकडे जातील.

मनमाडकडून अहमदनगरकडे येणारे जड वाहने पुणतांबा फाटा-वैजापुर-गंगापुर-कायगाव-नेवासा-शेंडी बायपास-विळद बायपास-केडगाव बायपास मार्ग जातील.

लोणी-बाभळेश्वरकडुन अहमदनगरकडे येणारी जड वाहने बाभळेश्वर-श्रीरामपुर-टाकळीभान-नेवासामार्ग अहमदनगरकडे येतील.

मनमाडकडुन अहमदनगरमार्ग पुणे-मुंबई-कल्याणकडे जाणारी जड वाहने पुणतांबा फाटा-झगडे फाटा-सिन्नर-नांदुर शिंगोटे-संगमनेर-आळेफाटामार्ग जातील.

हा आदेश शासकीय वाहने, रुग्णवाहिका,फायर ब्रिगेड, दिंडीमध्ये सहभागी असलेली वाहने व स्थानिक प्रशासनाने अत्यावश्यक कारणास्तव परवानगी दिलेल्या वाहनांना लागु राहणार नसल्याचेही आदेशामध्ये नमूद केले आहे.

तत्कालीन मनपा आयुक्त डॉ.पंकज जावळेंचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

नगर – बोधकाम परवानगीसाठी आठ लाखांची लाच मागितल्याप्रकरणी दाखल गुन्हात महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. पंकज जावळे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज नगर जिल्हा न्यायालयाने फेटाळून लावला आहे. बुधवारी सकाळी सुमारे दीड तास झालेल्या युक्तिवादानंतर सायंकाळी जिल्हा न्यायाधीश एन. आर. नाईक्वाडी यांनी जामीन अर्ज नामंजूर केला.

गुन्हा दाखल झाल्यापासून जावळे व स्वीय सहाय्यक श्रीधर देशपांडे दोघेही पसार आहेत. जावळे वॉर्ड ४ळे. सतीश गुगळे यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. त्यावर सुनावणी घेण्यात आली. ओंड. अभिजीत पुप्पाल यांनी फिर्यादीतर्फे युक्तिवाद केला. सरकार पक्षाकडून ओंड. अनिल घोडके यांनी युक्तिवाद करत अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली. जावळे यांचा पुण्यातील सहभाग स्पष्ट झालेला आहे, त्यांचा मोबाईल फोन हस्तगत करून त्याचा तपास करायचा आहे, त्यांना ट्रेंपची माहिती कुणाकडून मिळाली, यात आणखी कोण सहभागी आहे, याचा तपास करायचा असल्याने अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करावा, असा युक्तिवाद त्यांनी केला.

नगर महापालिकेत नवीन आयुक्त नियुक्त झाले आहेत. त्यामुळे जावळे हे पुन्हा महापालिकेत हस्तक्षेप करू शकत नाहीत. ९९ जुनला पैशांची मागणी नोंदवण्यात आली, रक्कमही निश्चित झाली. त्यामुळे पुन्हा २० जुनला व्हेरिफिकेशन करण्याची गरज काय, जावळे यांच्या विरोधात पुरावा तयार करण्याचा व त्यांना यात गोवण्याचा उद्देश यातून स्पष्ट होतो. त्यातही जावळे यांनी बोलून घ्या म्हटले आहे, त्याचा तर्क वेगळा काढण्यात आला. फाईल मंजूर झाली असतानाही फिर्यादीने पैशांचा विषय काढला. त्यावर आयुक्त जावळे यांनी तुमची फाईल मंजूर झाली आहे, विषय संपला आहे, इतर चर्चा करण्याचे कारण नाही, असे म्हटले आहे.

आयुक्तांना ट्रॅपची माहिती सुरुवातीला असती, तर देशपांडे सुट्टीवर गेले तेव्हाच तेही सुट्टीवर गेले असते. मात्र ते इथेच होते. त्यांना विनाकारण यात गोवण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचा संशय आल्याने ते नंतर सुट्टीवर गेले. त्यामुळे त्यांना अटक करण्यासाठी कोणतेही ठोस कारण नाही, ते तपासला उपलब्ध होऊ शकतात, असा युक्तिवाद ओंड. सतीश गुगळे यांनी केला. त्यावर न्यायालयाने सायंकाळी निर्णय देत जामीन अर्ज नामंजूर केला.

दीपिका गांधी सीए फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्युट ऑफ चार्टंड अकाउंटंटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) च्यावतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेली सी.ए.फायनल परीक्षा येथील दीपिका गांधी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली आहे. बालवाडी ते अकरावीपर्यंत तिने कायम प्रथम क्रमांक मिळवला. तिने आर्टिकलशिप सी.ए., आयषी अजय मुथा व पुणे येथील सी.ए.अनिल बोरा यांच्याकडे केली. तिने क्रमिक शिक्षण घेतानाच न्युमरोलॉजी व ग्राफोलॉजीस्टचाही कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला.

नगरमधील उद्योजक मोहनलाल वेडीचंद गांधी (कर्जतवाला) यांची ती कन्या आहे. तिला तिची आई सौ.आशा मोहनलाल गांधी, ज्येष्ठ बंधू लौकिक गांधी व धोरली बहिण हर्षदा गुंदेचा यांनी विशेष प्रोत्साहन व पाठबळ दिले.

प्रथम मुनोत सी.ए.फायनल परीक्षा उत्तीर्ण

नगर – इन्स्टिट्युट ऑफ चार्टंड अकाउंटंटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) च्यावतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेली सी.ए.फायनल परीक्षा येथील प्रथम कमलेश मुनोत (नेवासकर) चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला आहे. त्याने आर्टिकलशिप मुंबई येथील एम.जी.बी. अॅण्ड कंपनी येथे केली. त्याला सी.ए. मोहनलाल भंडारी, सी.ए.हितेंद्र व जिनेंद्र भंडारी यांनी मार्गदर्शन केले.

तो उद्योजक लालचंद मुनोत व मर्चंटस् बँकेचे माजी चेअरमन आनंदराम मुनोत यांचा नातू आहे. तसेच उद्योजक कमलेश लालचंद मुनोत यांचा तो मुलगा आहे.

हर्षदा गुंदेचा यांना अमेरिकेत एम.एस.(सॉफ्टवेअर) डिग्री प्राप्त



नगर – सौ. हर्षदा गुंदेचा (मायामी, फ्लोरिडा, अमेरिका) हिने अमेरिका येथे एम.एस. (सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग) ही उच्च पदवी चांगल्या गुणांनी प्राप्त केली आहे. तिचे शालेय शिक्षण बाई ईश्वरजबाई फिरोदिया प्रशाला व भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल येथे झाले.

अहमदनगर महाविद्यालयात पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यावर तिने लग्नानंतर एम.एस. (कॉम्प्युटर) हा पाच वर्षाचा अभ्यासक्रम अमेरिका येथे पूर्ण केला. तिच्या या यशात तिचे पती महेश गुंदेचा यांचे मोलाचे पाठबळ व प्रोत्साहन मिळाले. ती अमेरिकेतच आय.टी.क्षेत्रात करियर करणार आहे. सौ. हर्षदा या उद्योजक मोहनलाल देवीचंद गांधी (कर्जतवाला) यांची ज्येष्ठ कन्या आहेत.

जातीनिहाय जनगणनेसाठी १८ जुलै रोजी सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

नगर – जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने १८ जुलै रोजी देशव्यापी आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दिवशी महाराष्ट्रात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर तीव्र निदर्शने करण्याचा निर्णय कॉ. मिलिंद रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य सचिव मंडळ व जिल्हा सचिवांच्या संयुक्त बैठकीत नुकताच घेण्यात आला असल्याची माहिती पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ओंड. सुभाष लांडे यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने भारत हा आर्थिक महासत्ता बनत असल्याचा सातत्याने दावा केला असताना‌च, वेगवेगळ्या जाती-धर्मातील बेरोजगार तरुण स्वरयात उत्तरुन आंदोलन करताना दिसत आहेत. भारतीय समाज हा जातवर्गीय असल्याने बहुसंख्य तरुण मागास राहण्याचे कारण आर्थिक व सामाजिक देखील आहे. जातीय विषमतेने बहुसंख्य समूहाच्या आर्थिक विकासाच्या संधी हिरावून घेतल्या असल्याचे स्पष्ट दिसत आहे. म्हणून अशा मागास राहिलेल्या समूहाच्या सामाजिक, आर्थिक मागासपणाचे मापन करण्यासाठी जातीनिहाय जनगणना करणे आवश्यक असल्याचे भाकप्च्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाने व जनसंघटनांनी यापूर्वीही जातीनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी पाठपुरावा केला आहे. तसेच कम्युनिस्ट पक्षाच्या विजयवाडा येथे झालेल्या त्रैवार्षिक महाअधिवेशनातही जातनिहाय जनगणना करण्यासंदर्भात चर्चा होऊन ठराव मंजूर झालेला होता. याशिवाय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. डी. राजा यांनी राज्यसभेत देखील २०१७ साली जातनिहाय जनगणना करावी यासाठी खाजगी विधेयक मांडले होते. महाराष्ट्रात भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी संलग्न असलेल्या अखिल भारतीय दलित अधिकार आंदोलनाच्यावतीने नुकतीच राज्यव्यापी जातनिहाय जनगणना परिषद छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे घेण्यात आली होती.



सुभाष लांडे

केंद्र व राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात तसेच सर्व प्रकारच्या नियोजन करताना मागास जातींची नेमकी संख्या किती आहे? हेच माहिती नसेल तर त्या योजनांना आणि त्यावर मोघमपणे केल्या जाणाऱ्या आर्थिक तरतुदीला काहीही अर्थ राहत नाही. म्हणून जातनिहाय जनगणना तातडीने होणे आवश्यक आहे. युपीए सरकारने २०११ मध्ये जातनिहाय जनगणना केली. परंतु तिच्या अंतिम निष्कर्षाआधीच पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे सरकार पायउतार झाले. त्यानंतर २०१४ साली केंद्रात सत्तास्थानी आलेल्या मोदी सरकारने सातत्याने जातनिहाय जनगणनेचा विरोध केला असून, आरएसएसने जातीनिहाय जनगणना केल्यास जातीवाद वाढतो, अशी भूमिका घेऊन विरोध केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतःला मागासवर्गीय (ओबीसी) म्हणवून घेतात, परंतू जातीनिहाय जनगणनेच्या प्रश्नावर मौन धारण करतात. ही दुटप्पी नीती आता जनतेच्या लक्षात आली आहे. बिहार सरकारने जातीनिहाय जनगणना केली, त्याला भारतीय कम्युनिस्ट पक्षांसह इतरही कम्युनिस्ट पक्षांनी पाठींबा दिला. परंतु आरएसएसने सुप्रीम कोर्टात आव्हान दिल्याने जातीनिहाय जनगणनेच्या निष्कर्षानुसार या सरकारने वाढविलेली आरक्षण मर्यादा रद्द करण्यात आली. म्हणून केंद्र सरकारने यासंदर्भात भूमिका घेणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने जातीनिहाय जनगणनेचा ठराव विधीमंडळात करुन केंद्राकडे शिफारस करावी, अशी मागणीही भारतीय कम्युनिस्ट पक्ष करीत असल्याचे म्हंटले आहे.

या बैठकीत पक्षाच्या सर्व जिल्हा सचिवांनी आपापल्या जिल्ह्यात हे आंदोलन ताकदीने करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच आरक्षणाची मर्यादा ५० टक्के पेक्षा जास्त नसावी हे सर्वांच्या सर्वांच्या निर्देश अन्यायकारक असून, केंद्र शासनाने ५० टक्के ची मर्यादा उठवावी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष या आंदोलनाद्वारे करणार असल्याची माहिती पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ओंड. सुभाष लांडे, सहसेक्रेटरी कॉ. प्रा. राम बाहेती व कॉ. राजू दळवे यांनी दिली आहे.

600 sqft. Hall On Rent

अशी सुवर्णसंधी पुन्हा नाही..
दिल्लीगेट, सिद्धिबाग समोर,
न्यु आर्ट्स कॉलेजरोड, अ.नगर येथे
अटॅच बाथरूम, सी.सी.टि.व्ही.,
लिफ्टची सोय इ. सुविधायुक्त
600 स्क्वे.फूटांचा हॉल भाड्याने देणे आहे
- संपर्क -
Mo. 9270570699

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत जतीन नवीनचंद्र मेहता स. नवनीत कॉम्प्लेक्स, क्विन्स मढ़ी, फिरोदिया माडी समोर, अहमदनगर. यांच्या मालकीची आहे. सदर मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिल हसमचंद निर्मलाल महाटा स. कस्पे वीटभट्टी जवळ, प्लॉट नंबर ४१, आशीर्वाद कॉलनी, माराजनगर, अहमदनगर यांचेकडून कही रक्कम उसने घेतली असल्याने व तिची परतफेड केली नसल्याने सदर रक्कम वसुलीसाठी आमचे अशिल यांनी दिनांक दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदनगर येथे सदर मिळकतीचे मालकाविरुद्ध सदर रक्कम वसुलीसाठी विशेष दिवाणी दावा २३१/२०२३ चा दाखल केला आहे. सदर दाव्यात दावा रक्कमेचा बोजा सदर मिळकतीवर ठेवून मागितला आहे. सदर दाव्यामध्ये आमचे अशिल यांनी सदरहु मिळकत मालकांनी विक्री करू नये किंवा त्याचे तिऱ्हाईत इसमाचे हक्कात बोजा करू नये असेबद्दल तूर्तातूर्त मनाईहुकूमाचा अर्ज दिला आहे. सदर अर्जावर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदनगर यांनी दिनांक २५/०६/२०२४ रोजी आदेश पारित केलेला असून सदर मिळकतीच्या मालकाने म्हणजे जतीन नवीनचंद्र मेहता यांनी तिऱ्हाईत इसमाच्या हक्कात सदर मिळकतीबाबत कही व्यवहार करू नये असे बहत आदेश पारित केला आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कसलाही व्यवहार करू नये म्हणून व कोणाची कसलात हरकत नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.

मिळकतीचे वर्णन:-

अ) डी ।। अहमदनगर सब डी ।। ता. नगर पैकी शहर नगर येथील डाळमंडई भागातील मिळकत यावा दि.स.नं.१०९७ यावे क्षेत्र २०.०९ चौ.मी. सदर मिळकतीवर एक मजली बांधकाम असून तळमजल्याची लांबी पूर्व पश्चिम १५ फूट व रुंदी दक्षिण उत्तर १५ फूट या बांधकामाचे क्षेत्र २०.०९ चौ.मी. तळमजल व पहिला मजला मिळून एकूण बांधकाम क्षेत्र ४१.८० मी. मी. या तळमजल्यावर सागवानी लाकडाचे स्लॅब असून पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जिना आहे व दक्षिण बाजूस गॅलरी आहे. सदर मिळकतीचा वाग दक्षिणेस असून पहिल्या मजल्याचा वागता दरवाजा पश्चिमेस आहे. सदर मिळकतीचे बांधकाम हे विटा मातीमध्ये आहे. सदर मिळकतीच्या चतुःसीमा :- पूर्वेस – सि.स.नं. ९०९८, दक्षिणेस- पंजाब नॅशनल बँकेसमोरील डाळमंडईतील रस्ता, पश्चिमेस बोळ, उत्तरेस – सि.स.नं. ९०९६ या मिळकतीमध्ये असणारा प्रतिवादी १/२ अविभक्त हिस्सा.

ब) डी।। अहमदनगर सब डी।। ता. नगर पैकी शहर नगर येथील नगर गावठाण हद्दीतील सि.स.नं. २६७३ यावे क्षेत्र २९८.२ चौ. मी. यावर बांधण्यात आलेले नवनीत अपार्टमेंट या रिटीसर्व्हे नंबर २६७३ च्या चतुःसीमा:- पूर्वेस रस्ता, दक्षिणेस- सि.स. नं.२६४, पश्चिमेस- सि.स.नं. २६७२, उत्तरेस – सि.स.नं. २६७४ येणेमाणेची रिटीसर्व्हे मिळकत या मिळकतीवर असणारा पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४ यावे क्षेत्र ६९.७० चौ.मी. यांची चतुःसिमा : पूर्वेस- पॅसेज व जिना, दक्षिणेस- सदर रिटीसर्व्हे नंबरची उर्वरित जागा, पश्चिमेस- सदर रिटीसर्वे नंबरची उर्वरित जागा, उत्तरेस- बोळ व सदर रिटीसर्व्हे नंबरची उर्वरित जागा.

ता.११/०७/२०२४

ॲड. श्रीराम प्रभाकर भारदे
ऑफिस :- गंगा पेंबर्स, जुन्या जिल्हा न्यायालयामागे, अहमदनगर. मो. नं. ९८२२७९३१०२

भाड्याने देणे

दिल्लीगेट, नालेगाव परिसर २००० स्क्वे.फूट, आरसीसी बांधकाम, हॉल, क्लिनिक, ऑफिस, इन्स्टिट्यूट, क्लॅस, पतसंस्थासाठी भाड्याने देणे आहे.पहिला मजला स्वतंत्र ब्लॉक व रोड टच साईड.
9673356462
9975317417

दिल्लीगेट जवळ जागा भाड्याने देणे

सिध्दीबाग समोर, सम्राट हॉटेल शेजारी, निलक्रांती चौक येथील 180 स्क्वे.फूट जागा भाड्याने देणे आहे
9422267586
7887729960

भाड्याने/विकत देणे आहे

रोडटच हॉल पहिला मजला भाड्याने/विकत देणे आहे.
(४०० स्क्वे.+अंटेच टॉवेल)
सोनल कॉम्प्लेक्स, चौपाटी कारंजा,दिल्लीगेट, अ.नगर
7058801117
9822740422

गोडाऊनसाठी जागा भाड्याने देणे

तारकपूर बसस्टॉप समोर कोर्टयार्ड बिल्डिंगमध्ये तळमजल्यावर ७५० ते ८०० स्क्वे. फूट जागा गोडाऊनसाठी भाड्याने देणे आहे.
9422220702
7875553939

कुपन हरवले

अरुण गंगाराम बोज्जा या नावाचे पिवळे रंगाचे कुपन तलाठी ऑफिस जवळपास हरवले आहे. कुणाला सापडल्यास संपर्क करणे.
9371803706

रौ-हाऊस त्वरित विकणे आहे

नवनागापूर, साईजगन्नाथ येथील ५१२ स्क्वे.फू. जागा, ६२० स्क्वे.फू. बांधकाम खाली व वर चार रुमचा रौ-हाऊस योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे
संदीप, रिधवी पनी सोप
स्वतंत्र गेट, समोर ओपन प्लॉट
9324685388

वन रुम किचन भाड्याने देणे आहे

मार्केटयार्ड आनंदधामजवळ
9823152656

पाहिजेत

* ऑफिस मदतनीस
* मार्केटींग मदतनीस

पुरुष, वयोमर्यादा-२८, किमान १२ वी, कॉम्प्युटरची बेसीक माहिती आवश्यक.
: संपर्क :
आर.बी.इलेक्ट्रॉनिक्स
झेरॉक्स मशिन सेल्स ॲण्ड सर्व्हिस
स्वस्तिक चौक, स्टेशनरोड,अ.नगर
9822595890

अहमदनगर गॅस कंपनी

सातपुते तालीमसमोर, गुरुकुंज अपार्टमेंट येथील सर्व एच.पी. गॅस ग्राहकांना कळविण्यात येते की, ग्राहकांचे ई-केवायसी करण्यासाठी ग्राहकांनी एन्ऱसीला त्वरित संपर्क करावा व येताना गॅस पुस्तक व आधार कार्ड घेऊन यावे.
गॅस कनेक्शन ज्याच्या नावावर आहे त्याच व्यक्तीने यावे.
फोन : २३४४८२४/२३४१८३३

१२/२४ तास लहान बाळ सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे

(वयोमर्यादा १८ ते ४०)
संपर्क : **8888576576**



सिनियर अकौंटंट पाहिजे

२ वर्षांचा अनुभव आवश्यक
सक्कर चौक, अ.नगर
- संपर्क -
9028041234

होलसेल दुकानाकरिता मुले पाहिजे

बॉक्स पॅकींगसाठी जागा : २
बिलिंगकरिता जागा : १
9850396907

पाहिजेत

टायपिस्ट (इंग्रजी) पूर्णवेळ/अर्ध वेळ
पोलॅरिस डायग्नोस्टिक्स्
ग्रावोडाश रघु समक्ष भेटा ठेळ : कृपारी ४ ते ५
पदपर्वम पॉक, दादा पाटील शाळे जवळ, अ. नगर
9769896293
8080225426

त्वरित पाहिजेत

सावेडी येथील कॉस्मेटिक्स दुकानासाठी अनुभवी महिला कामगार पाहिजे
जागा : ४
आपला बायोडाटा खालील मोबाईल नंबरवर व्हॉटस ॲप करणे
9545381937

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
वासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

कलेक्शनसाठी मुले पाहिजेत

फायनान्स लिव्ह क्लेटील कामाचा अनुभव आवश्यक (टिप : स्वतःची दु-व्हीलर आवश्यक)
9881634444

पाहिजेत

ज्योतिष कार्यालयात कामासाठी मुलगी पाहिजे. शिक्षण १० वी १२ वी.
8806070404

Ahmednagar's First Biggest & Multi Super Speciality Hospital having 135 beds, fully equipped medical services, providing International Standards
Requires

- Computer Operator 02
- Receptionist 02
- Accountant 02
- Floor Co-ordinator 02
- Supervisor 02

All above Posts are preferred with Qualifications and Experiences
Apply or Contact to -
Mr. Rahul Hire (Administrator) **M. 982228 7004**
E-Mail : rahul.hiray007@gmail.com
ASIAN NOBLE HOSPITAL
Premdan Chowk,Savedi Road, Ahmednagar.
Tel.: 2421290-91-92
Dishan

EARTH'S Green Library
Greenery for Every Space
Get a Plant Today!
- Potted Planters
- Premium Planters
- Garden Accessories
- Garden Furniture
- Garden Lightings

Fresh Environment with Indoor Plants
Amit Sankleche 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज

शून्य टक्के प्रोसेसिंग फी
9% व्याजदर
प्रति तोळा ₹ 58000
(दि. ६ ते ७ जुलै / सा.वा.७ ते ७ / सौ.नं.१३६१/६)
लक्ष्मीनारायण बहुउद्देशी नागरी पतसंस्था मर्या.
ऑफिस पत्तेदारांची जागा
7888219471, 94231 67850
बागडपट्टी, अहमदनगर

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक आणेर हनीफ खान, स. न्यामत खान मोहम्मद, जुनी महानगरपालिका रोड, पांचपिर चावडी, अहमदनगर यांच्या मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असून व्यवहार खरेदीस होणार आहे. सदर मिळकत निर्विघ्न व निजोखमी आहे असे खरेदी देणारांचे म्हणणे आहे. परंतु कोणापैकी कोणतीही तक्रार राहू नये म्हणून जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणाकोही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, वाद, आक्षेपत, अपेक्षेपत, करारनामा, गहाणे, दान, भाडेपट्टा, दावा, बक्षीस, पोटगी इत्यादी हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १० (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्तावर संपूर्ण कागदोपत्री पुरव्यानिशी लेखी कळवावे. जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही तक्रार करणे अगर हरकत घेतलार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे केडगांव** येथील बिगरशेती खुल्या प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ
३०१ / १अ	३४ हा संपूर्ण प्लॉट.	३१९.३६ चौ. मीटर

यांची चतुःसिमा :
पुर्वेस – प्लॉट नं. ४२ व ४१, दक्षिणेस – प्लॉट नं. ३५,
पश्चिमेस – ५ मी. सामाईक रस्ता उत्तरेस – प्लॉट नं. ३३.

अॅड. नवनीत एम. केळा
गोलपी पलिस (भारत सरकार)
अॅड. मोहसीन आर. शेख
अॅड. मुफ्फान एम. मोमीन
कस्तुरी प्लाझा, झमरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ९२७०५४९७०/८०८७४४५४२८

दि. १९/०७/२०२४
अहमदनगर.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेला मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे सदर मिळकत निर्विघ्न, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणापैकी तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही बाधा, वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, धार्मा, लीन, इत्यादि अगर इतर कोणताही बाधा वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन घ्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे कही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. सा. १९/०७/२०२४

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगर, **महानगरपालिका हद्दीतील मौजे भाळेगांव येथील** खालील वर्णनाची मिळकत –

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ
४६/२	१२+१३/१	५८३.९२ चौ मी

यावर बांधलेला इमारतीचे नांव – **आयकॉन टॉवर**
यापैकी
**सेफ्ट फ्लॅटस्मधील मिराशी सदनिका नंबर ७ यावे बाल्कनीसह कारपेट क्षेत्र ७५.३१ सी.मी.,ब्रिल्टप्रेश क्षेत्र ७४.१३ चौ.मी., या मिळकतीबाबत तारीख ०५/०९/२०११ रोजी दस्त क्र. ५५३३/२०११ अनन-३ अन्वये खरेदीखत दस्त नोंदविलेला असून, व सदर मिळकतीचे मालक श्री. निखिल प्रमोद वर्मा आहेत व सदरचे मुळ दस्त मालक श्री. निखिल प्रमोद वर्मा यांनी साभडत नाही व मुळ दस्त हरविल्याचे प्रसंग झाले. मुळ दस्त शोधूनही सापडलेला नाही. तरी यादत्या मुळ दस्त सापडल्यास खाली नमुद केलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा व सदरचा दस्त आपूर्ण द्यावा ही विनंती.

दिनांक १९/०७/२०२४
संपर्कगाही पत्ता-
श्री. निखिल प्रमोद वर्मा
रा. फ्लॅट नंबर ७, ४६/२, आयकॉन टॉवी,
आनंद नगर स्टेशन रोड, अहमदनगर.
ॲड.आर.टी.शर्मा
फोन नं. २३४१९०६, ९२२६१९०६ मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४, १७ पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, डाळमंडई, अहमदनगर

डॉ.अद्वैत गिते

MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशियन

- थेरपाचारील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
- पादुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
- डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस

यावरील सर्व आजारांच्या निदानासठी जपानमधील अत्याधुनिक नुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

- सर्व आजारांसाठी ऐडमिट सुविधा उपलब्ध.
- सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीजोरी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिवीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

एशियन नोबल हॉस्पिटल
प्रेमदान चौक, अ.नगर
रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

ग्रामपंचायत मंजूर, ता.कोपरगाव, जि. अहमदनगर
जाहीर निविदा

ग्रामपंचायत मंजूर, ता.कोपरगाव, जि. अहमदनगर खालील कामाचे नॉदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी -१ निविदा दरपत्रके मागविनेत येत आहे.

अ.नं.	कामाचे नाव	योजना	निविदा रक्कम	ठेकेदाराचा वर्ग
१	मौजे मंजूर येथील अनिल जगताप घर ते विरोबा मंदिर रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१५ वित्त आयोग- सन २०२४-२५	२,७८,८६६/-	सु.वे.
२	मौजे मंजूर येथे राजवाडा पिण्याच्या पाण्याची टाकी व पाईपलाईन दुरुस्ती करणे.	१५ वित्त आयोग- सन २०२४-२५	९६,६९,०९/-	सु.वे.
३	मौजे मंजूर येथे पाईपलाईनसाठी नवीन बोर बसविणे.	१५ वित्त आयोग- सन २०२४-२५	८४,२०४/-	खुला
४	मौजे मंजूर येथे अंगणवाडी दुरुस्ती करणे	१५ वित्त आयोग- सन २०२४-२५	९६,००००/-	खुला

अटी व शर्ती : १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. १९/०७/२०२४ ते १८/०७/२०२४ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी-१ निविदा दि. १९/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखुन ठेवला आहे.
निविदेसोबत - १) वि. प.नोंदणी २) जी.एस.टी. ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला

ग्रामसेवक/सरपंच
मंजूर, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

घ.नं. 451/सदर बाजार/2024-25
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक– 02/07/2024

जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे जाहीर करण्यात येते की, (1) श्री शाम भगवान परदेशी, वय–55 वर्षे, (2) श्री. संकर भगवान परदेशी, वय–53 वर्षे, राहणार कॅम्प, भिंगार, ता.जि. अहमदनगर यांनी घर नं. 451, सदर बाजार, स्वर्वे नं. 213/489, सदर बाजार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) कायदेशिर वारसा प्रमाणपत्र क्र. 141/2015 दिनांक 21/08/2018 (2) संमती प्रतिज्ञापत्र क्र. 2245 दि. 07/08/2019 (3) प्रतिज्ञापत्र क्र. 2243 दि. 07/08/2019 च्या आधारावर आमचे नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत. सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, बेचरी हक्क हितसंबंध असेल, या अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून 30 (तीस) दिवसांचे आत रक्कम कागदपत्रांचे पुरव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावनी परिषद, अहमदनगर यांकेडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ.नं. 451, सदर बाजार
क्षेत्रफळ 1020.00 चौ.फूट

कार्यालय अधिकाऱ
कृते मुख्य अधिकारी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(चिन्हांक गोरे)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलत बरोबर ठरलेला असुन त्याप्रतीनी आमच्या अशिलाकडुन विद्यमान मालकांनी विश्वासाची खुप मोठी रक्कम मिळवलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व नहिवाटीची असुन सदर मिळकत निर्विघ्न, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणापैकी तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालु वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, धार्मा, लीन, इत्यादि अगर इतर कोणताही बाधा वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन घ्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे कही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. सा. १५/०७/२०२४

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, तालुका नगर, **महानगरपालिका हद्दीतील मौजे भाळेगांव येथील** खालील वर्णनाची मिळकत –

सर्व्हे नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ
४६/२	१२+१३/१	५८३.९२ चौ मी

यावर बांधलेला इमारतीचे नांव – **आयकॉन टॉवर**
यापैकी
सेफ्ट फ्लॅटस्मधील मिराशी सदनिका नंबर ७ यावे बाल्कनीसह कारपेट क्षेत्र ७५.३१ सी.मी.,ब्रिल्टप्रेश क्षेत्र ७४.१३ चौ.मी., फिनिश व फिक्चरसह, साईट गीटर नळ कमोडनसह आहे रचा स्थितीत संपूर्ण

मिळकत सदर मिळकतीचे बांधकाम १३ वर्ष जुने आहे.
यांची चतुःसिमा :

पुर्वेस	फ्लॅट नंबर ६ व ९०
दक्षिणेस	ओपन टू स्थाय
पश्चिमेस	ओपन टू स्थाय
उत्तरेस	फ्लॅट नंबर ८

विद्यमान मालकाचे नाव-
श्री. निखिल प्रमोद वर्मा
रा. फ्लॅट नंबर ७, ४६/२, आयकॉन टॉवी,
आनंद नगर स्टेशन रोड, अहमदनगर.

ॲड.आर.टी.शर्मा
फोन नं. २३४१९०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला श्री आनंद कॉम्प्लेक्स, डाळमंडई, अहमदनगर

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक यांचा मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. नमुद मिळकतीची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाबरोबर केलेली आहे त्याहारे नमुद मिळकत कायमचुके खरेदी कामी आमच्या अशिलाच प्रस्ताव दिलेला अगुर विश्वासपोटी मोठी रक्कम देखील घेतलेली आहे. परंतु कोणापैकी तक्रार राहु नये म्हणुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की नमुद मिळकतीबाबत कोणाही चालु वाद असल्यास अथवा साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकूम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी रहीदल अथ वक्फ लिन अथवा आर कोणाची व्यवस्थाही असल्यास हक्क, हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ८ दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रत्यक्ष व समक्ष उपस्थित राहुन अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य त्या कागदोपीर कागदोपत्री नकलांच्या पुरव्यानिशी लेखी कळवावे. समक्ष व पोहाने हरकत व कबजिदार यस्थानची वर्णमानसाठुन जाहीर केलेला हरकतीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. जर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास ज्याचे कही हक्क हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजुन आमचे अशिल नमुद मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

१) मिळकतीचे वर्णन :-
हि.। अहमदनगर सब. हि. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपरपालिका हद्दीतील **शहरमनार** येथील सावेडी पागातील मे. दु. निवेदक राहीद, अहमदनगर यांचे कब्जेतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

टि.पी. स्कीम नंबर	फायनल प्लॉट नंबर	प्लॉट नंबर	क्षेत्रफळ चौरस मीटर
४	१०१	७९	४४१.००

अ) सदर प्लॉटवर मंजुर प्लॅनप्रमाणे आर. सी. सी. स्ट्रक्चर फ्रेमवाचे बांधकाम झालेला तळमजा गंगा अ अपार्टमेंट मधील शाजंद फ्लॅटआरपैल फ्लॅट नं. ५ यावे क्षेत्र ३३.६५ चौ.मी. (३३०.०० चौ. फुट) फ्लॅट मिळकत.

यांची चतुःसिमा

पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
फ्लॅट नं.६	मिळकतीपैकी ओपन फ्लॅट व लॅण्ड	मिळकतीपैकी ओपन फ्लॅट व लॅण्ड	ओपन स्पेस व स्टेअरपेस

ब) सदर प्लॉटवर मंजुर प्लॅनप्रमाणे आर. सी. सी. स्ट्रक्चर फ्रेमवाचे बांधकाम झालेला तळमजा गंगा अ अपार्टमेंट मधील शाजंद फ्लॅटआरपैल फ्लॅट नं. ६ यावे क्षेत्र ३३.६५ चौ. मी. (३३०.०० चौ. फुट) फ्लॅट मिळकत.

यांची चतुःसिमा

पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
फ्लॅट नं. ७	मिळकतीपैकी ओपन फ्लॅट व लॅण्ड	फ्लॅट नं. ५	ओपन स्पेस व स्टेअरपेस

(टिप :- वर कथन ९ यांचेत मिळकतीच्या चतुःसीमा लिहुन देणेत यांनी दिलेल्या माहितीवरुन व प्रत्यक्ष बांधकामावरुन नमुद केलेल्या आहेत. परंतु जर कही चुक/चुका आढळुन आल्यास त्याबाबत गुन्हाही दाखी व नुकसान व लागणा वाजवीचा रेकॉर्डवरती आणि मा. सहायक संचालक नगर, नगर रचना विभाग, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचेकडील अंतिम रेखांकनामध्ये असलेल्या तसेच प्रत्यक्ष भौतिकी जोगी उभा चतुःसीमा आणावीत असल्यास आहेत.)

येणेप्रमाणे चतुः समाधुर्वक कही एक राखुन व देणेता.

मिळकतीचे विद्यमान मालक -
१. जेरुजीन बाबासा माहजन हेदर निंबु
रा. सावंतनगर अपार्टमेंट, फ्लॅट नं. ५ - ६, शनिप्रसाद रोड, सावेडी, अहमदनगर.
२. ॲगीलिया मारिया माहजन हेदर निंबु
रा. घर नं.७, उदयापंद पेठ, शिष्य मंदिर शेजारी, शिरपुर, ता. कासुप येदी, आसाम ४८१७०१

ॲड. संदिप दादासाहेब पाऱसे
पत्ता – जिल्हा न्यायालय, अहमदनगर
६२७०, लक्ष्मी दिप निवास, बालिकाश्रम जवळ, अहमदनगर मो.९८५०१८५७१०

दि. १९/०७/२०२४.